७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०४० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## राज्याचा आणखी एक मंत्री थोडक्यात बचावला

पुणे (दै. संध्या) : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. या अपघाताच्या धक्क्यातून अजूनही लोक सावरलेले नाहीत. राज्यातील जनतेसाठी हा अत्यंत मोठा धक्का होता. अजितदादा आपल्यात नाहीत यावर कुणाचाही विश्वास बसत नाहीये. ही घटना ताजी असतानाच राज्याचा आणखी एक मंत्री अपघातातून थोडक्यात बचावला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे अपघातातून बचावले आहेत. त्यांनीच स्वत:ही माहिती दिली. काल माझ्या कारचा अपघात झाला. थोडक्यात वाचलो. नाही तर आज माझ्या श्रद्धांजलीची वेळ आली असती, असं संजय शिरसाट यांनी सांगितलं. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकीच्या निमित्ताने काल छत्रपती संभाजी नगर येथे संजय शिरसाट यांची प्रचाराची सभा होती. यावेळी त्यांनी भाषण करताना काळ वेळ कशी सांगून येत नाही हे मतदारांना सांगत असतानाच त्यांच्या अपघाताचा किस्साही सांगितला.

### ढिंग-टांग




# हरित महाराष्ट्रासाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा

- हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश
- वृक्ष लागवड मोहिमेत स्टार्टअपचा सहभाग घ्यावा
- रोप निर्मितीसाठी खासगी नर्सरी व बचतगटांचा सहभाग घ्यावा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



मुंबई (दै. संध्या)

पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण - ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा.स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.

मराठवाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे. मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एमआरएसएसी) चे संचालक श्री. कोलते आदी उपस्थित होते.

### ब्रेकिंग न्यूज

## 'महायुतीला मत म्हणजे खरी श्रद्धांजली'

सांगोला (दै. संध्या) : सांगोला येथे झालेल्या प्रचारसभेत शिवसेना (शिंदे गट) नेते शहाजी बापू पाटील यांनी महायुतीला मत देण्याचे आवाहन करताना आक्रमक भूमिका घेतली. अजित पवार यांच्याशी संबंधित घटनेचा उल्लेख करत त्यांनी, "महायुतीला दिलेले मत म्हणजे अजित पवारांना दिलेली खरी श्रद्धांजली आहे," असे वक्तव्य केले. या सभेत मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि समर्थक उपस्थित होते. शहाजी बापू पाटील म्हणाले की, अजित पवार यांनी राज्याच्या विकासासाठी घेतलेले निर्णय आणि त्यांची कार्यशैली जनतेच्या लक्षात आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचे काम महायुतीच करू शकते, असा दावा त्यांनी केला. त्यांनी मतदारांना भावनिक आवाहन करत महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. या वेळी त्यांनी विरोधकांवरही टीका केली. विरोधकांकडून केवळ टीका आणि दिशाभूल केली जात असून, विकासाबाबत ठोस भूमिका नसल्याचा आरोप त्यांनी केला.

## सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

पुणे (दै. संध्या) : सराफा बाजारात (ता. २ फेब्रुवारी) मोठी उलथापालथ पाहायला मिळाली असून, सोने आणि चांदीच्या दरात तीव्र घसरण नोंदवण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील बदल, डॉलरची मजबुती आणि देशांतर्गत पातळीवरील विक्रीच्या दबावामुळे मौल्यवान धातूंच्या किमती कोसळल्या आहेत. या घसरणीचा थेट फटका गुंतवणूकदारांना बसला असून, अनेकांच्या गुंतवणुकीत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे चित्र आहे. आज मुंबई, पुणेसह राज्यातील प्रमुख सराफा बाजारात सोन्याच्या दरात मोठी घट झाली आहे. गेल्या काही दिवसांत उच्चांक गाठलेल्या सोन्याचे भाव अचानक खाली आल्याने खरेदीदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. चांदीच्या दरातही मोठी घसरण झाली असून, अल्पावधीत झालेल्या या पडझडीमुळे चांदीतील गुंतवणूकदार अधिक अडचणीत आले आहेत. काही गुंतवणूकदारांनी नफ्यासाठी विक्री केल्यामुळे बाजारात 'सेलिंग प्रेशर' वाढले आणि दर आणखी घसरले.

## लाडक्या बहिणींना मिळणाऱ्या पैशांमध्ये वाढ होणार, शिंदेंची मोठी घोषणा


मुंबई (दै. संध्या)



सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केली आहे, या योजनेंतर्गत दर महिन्याला लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. विधानसभा निवडणुकीपूर्वी ही योजना सुरू करण्यात आली होती, या योजनेचा तत्कालीन महायुती सरकारला मोठा फायदा देखील झाल्याचं पहायला मिळालं. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं, दरम्यान विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी जर आमची राज्यात सत्ता आली तर आम्ही लाडक्या बहिणींच्या सन्मान निधीमध्ये वाढ करू, 1500 रुपयांऐवजी 2100 रुपये देऊ, असं अश्वासन त्यावेळी महायुतीच्या काही नेत्यांकडून देण्यात आलं होतं, मात्र आता सरकार सत्तेत येऊन दीड वर्ष होत आलं, तरी देखील लाडक्या बहिणींच्या सन्मन निधीमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. आता या योजनेसंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी छत्रपती संभाजीनगरमध्ये बोलताना मोठी घोषणा केली आहे.

## ११ तारखेला मिळणार मुंबईला महापौर

मुंबई (दै. संध्या)



मुंबई महानगर या शहराला महापौरपदाच्या निवडीची तारीख आता ठरली आहे. गेल्या महिन्यात १६ जानेवारीला निकाल लागून महिना होत आला तरी राज्यातील प्रमुख शहरांना महापौर मिळाले नाहीत आंतरराष्ट्रीय शहर असलेल्या मुंबई महानगराला सुद्धा अद्यापी महापौर मिळाला नाही. परंतु आता सर्व प्रशासकीय तयारी चालू झाली आहे. येत्या ११ फेब्रुवारी रोजी महापौरपदासाठी मतदान केले जाईल अशी माहिती आहे.

राज्यातील महानगरपालिका निवडणुका नंतर सगळीकडे महापौर पदासंबधात चर्चा होती. या सर्व महापालिकांपैकी मुंबईची महानगरपालिका चर्चेच्या केंद्रस्थानी होती. कारण या पालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी सर्वच पक्षांनी जोर लावला होता. मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दोन्ही दिग्गज नेते एकत्र आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून दोन्ही भावांनी एकत्र यावे, अशी इच्छा व्यक्त केली जात होती. या दोन्ही भावांच्या युतीची ऐतिहासिक घटना घडली. परंतु या निवडणुकीत महायुतीने बाजी मारली असून भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. आता मुंबईच्या महापौरपदी नेमकं कोण बसणार? याची सर्वांनाच उत्सुकता लागली होती. ही उत्सुकता आता संपणार असून येत्या ११ फेब्रुवारी रोजी मुंबईकरांना त्यांचा नवा महापौर मिळणार आहे. मुंबईच्या नव्या महापौराच्या निवडीसाठी येत्या ११ फेब्रुवारी रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यासाठी सर्व प्रशासकीय तयारी करण्यात येत आहे. या निवडीसाठी येत्या ६ फेब्रुवारी रोजीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होईल. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर ११ फेब्रुवारी रोजी मतदान होईल. त्यानंतर महापौर कोण होणार हे स्पष्ट होईल.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या महापौरपदासाठी महायुतीत बराच खल चालू होता. निवडणुकीचा निकाल लागताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले सर्व नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये हालवले होते. घोडेबाजार टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. एकनाथ शिंदे यांनी आपल्याच पक्षाला मुंबईचे महापौरपद मिळावे यासाठी बरेच प्रयत्न केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस दौऱ्यावर असल्यामुळे महापौरपदाच्या निवडीची चर्चा रखडली होती. शिंदे गट आणि भाजपा यांच्यात चर्चा झाली आहे. दोन्ही पक्षांनी आपापली वेगळी गट नोंदणी केली आहे. भाजपने आपला गटनेता नियुक्त केला आहे जेष्ठ नगरसेवक गणेश खणकर, तर शिंदे सेनेकडून अमेय घोले यांची गटनेते पदी नियुक्ती केली आहे. त्यामुळे आता लवकरच मुंबईला महापौर मिळणार आहे.

## जस्टिस लोयांची आठवण झाली... अजितदादांच्या अपघातावर राऊतांचा गंभीर आरोप!

**राज्यसभेत न्यायालयीन चौकशीची मागणी**

नवी दिल्ली (दै. संध्या)



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर अनेक गंभीर सवाल उपस्थित होत असून, हा केवळ अपघात की घातपात, असा थेट प्रश्न आता राजकीय पातळीवर उपस्थित केला जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज राज्यसभेत अजित पवारांच्या मृत्यूवरून भाजपवर जोरदार हल्लाबोल करत न्यायालयीन चौकशीची स्पष्ट मागणी केली.

राज्यसभेत बोलताना संजय राऊत म्हणाले की, १५ जानेवारी रोजी अजित पवार यांनी भाजपवर सिंचन घोटाळ्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता. "भाजपने सिंचन घोटाळ्यात पैसा खाल्ला असून, त्याची संपूर्ण फाईल माझ्याकडे आहे," असे अजित पवारांनी जाहीरपणे सांगितले होते. मात्र, त्यानंतर अवघ्या दहा दिवसांतच त्यांच्या विमानाचा अपघात होऊन त्यांचा मृत्यू झाला. ही घटना अत्यंत संशयास्पद असून, ती सहज दुर्लक्षित करता येणार नाही, असे राऊत यांनी ठामपणे सांगितले.

संजय राऊत यांनी पुढे दावा केला की, सिंचन घोटाळ्याची फाईल अजित पवार कायम स्वतःसोबत ठेवत असत. बारामतीला जातानाही ती फाईल त्यांच्या जवळ होती. मात्र, त्याच बारामती परिसरात विमान दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी संसदेत केली.

यावेळी राज्यसभेतील सभापतींनी "तुमची वेळ संपली आहे, हा आजचा विषय नाही," असे सांगून राऊतांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संजय राऊत यांनी आपले म्हणणे मांडत "अजित पवारांच्या मृत्यूकडे पाहिले की मला न्यायमूर्ती लोया प्रकरणाची आठवण येते," असे विधान करून सभागृहात खळबळ उडवून दिली.

दरम्यान, "अजित पवारांवर ७० हजार कोटींचा आरोप केला गेला, तरी ते सत्तेत सहभागी झाले. पण भाजपने सिंचन घोटाळ्यात पैसा खाल्ल्याचा आरोप अजित पवारांनी केला होता, हाच मुद्दा धोकादायक ठरला," असा गंभीर आरोपही संजय राऊत यांनी केला. संजय राऊत यांच्या या वक्तव्यामुळे अजित पवारांच्या अपघाती निधनाबाबतचा संशय अधिक गडद झाला असून, या प्रकरणाची चौकशी होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## राष्ट्रवादीच्या मुंबई पदाधिकाऱ्यांकडून 'दादांच्या' अस्थींचे विधीपूर्वक विसर्जन



मुंबई (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आज विधीपूर्वक बाणगंगा तलाव वाळकेश्वर येथे करण्यात आले. अमर रहे...अमर रहे... अजितदादा अमर रहे... अशा घोषणा देत अजितदादांच्या अस्थींचे विसर्जन करण्यात आले.

## भाजपची परवानगी घ्यावी लागेल : छगन भुजबळ

मुंबई (दै. संध्या)



अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चेला सुरूवात झाली. दावे प्रतिदावे केले जात असतानाच अजित पवार गटाचे जेष्ठ नेते राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी आता भाजपला विचारल्या शिवाय निर्णय घेता येणार नसल्याचे वक्तव्य नाशिक येथे बोलताना केले आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणावर बोलताना त्यांनी म्हटले की, दोन्ही ठाकरे बंधू जसे एकत्र आले तसे पवार एकत्र यावे असं वाटत आहे. परंतु अशा काही चर्चा झाल्या का याबाबत माहिती नाही. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की माझ्याशी अजित पवार त्याबाबत कधीही बोलले नाहीत. परंतू जे काही करायचे ते आम्हाला बीजेपी सोबत राहून करायचे आहे. असे करायचे असले तर त्याबाबत आम्हाला भाजपला विचारावे लागेल. कोणाला घ्यायचे आणि कोणाला नाही घ्यायचे याबाबत भाजपच्या काही ज्येष्ठ मंडळींना विचारावं लागेल. कारण काय बोलणं झालं होतं हे माझ्यासह कोणालाही माहीत नाही. असे भुजबळ यांनी माध्यमाशी बोलताना सांगितले.

जेष्टनेते शरद पवार यांच्यासह अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी येत्या १२ तारखेला दोन्ही पक्षांचे विलिनीकरण होणार होते अशी माहिती दिली आहे. या विलिनीकरणा बाबत अजित पवार यांच्यासोबत अनेक बैठका झाल्या होत्या अशीही माहिती समोर आली आहे. मात्र आधी नगरपंचायत त्यानंतर महानगर पालिका आणि आता जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमुळे हे विलिनीकरण होऊ शकले नव्हते. अशातच आता राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी याबाबत केलेले विधान महत्वाचे आहे.

नाशिक येवला येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मंत्री छगन भुजबळ यांनी वेगवेगळ्या मुद्द्यांवर भाष्य केले. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर बोलताना त्यांनी म्हटले की, ज्यांच्या सोबत आपण सरकारमध्ये आहोत त्यांना तर विचारावे लागेल ना. जर सरकार मधून बाहेर पडायचे असा विचार दादांनी केला असेल असे कदापिही आम्हाला वाटत नाही. असे सांगून ते पुढे म्हणाले की, आम्ही उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांची निवड केली. आता त्यांच्या नेतृत्वात चर्चा होतील ना, आजच व्हायला पाहिजे, उद्याच व्हायला पाहिजे असे काही नाही. राजकारणाच्या गोष्टी कधी होतात कधी नाही होत.

## दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येऊ नये म्हणून कट शिजला

**विजय वडेट्टीवार**

मुंबई (दै. संध्या)



दोन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येऊ नये म्हणून कुठेतरी कट शिजला आणि त्यातून ही ठिगणी पडली असे मला वाटते, खरंतर आपल्या संस्कृतीला आणि आपल्या हिंदू परंपरेला धरून हा शपथविधीचा कार्यक्रम झाला असं कोणीच मानायला तयार नाही. हा निर्णय सुनेत्रा ताईंनी एवढ्या घाईने का घेतला असं लोकांचं मत आहे, कदाचित भाजपच्या दाबावापुढे असा निर्णय झाला असावा. असे मत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि त्यानंतर राज्यातील राजकारणात एक वेगळे वळण आले. राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. अजित पवार यांचा तेरावा होण्यापूर्वीच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावरून आता राजकारण रंगताना दिसत आहे. दुसरीकडे शरद पवार यांनी सांगितले की, सुनेत्रा पवार यांच्या शपथविधी बद्दल आपल्याला कोणतीही कल्पना नाही. अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या घडामोडीवर विजय वडेट्टीवार यांनी मोठे विधान केले. वडेट्टीवार यांनी विलगीकरणाबद्दल बोलताना म्हटले की, अजित पवारांनी का कल्पना दिली नाही किंवा सांगणे आवश्यक आहे का? हा त्या पक्षाचा निर्णय आहे. भारतीय जनता पक्षाला का सांगितले नाही? किंवा त्यांना सांगितल्या शिवाय पुढचा कार्यक्रमच ठरत नाही का? मग हा पक्ष भारतीय जनता पक्ष म्हणेल, त्याच पद्धतीने चालतो का? असे अनेक सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केले आहेत.

# संपादकीय

## पायाभूत सुविधांना मेगाबूस्टर

चांगल्या वाहतूक सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे लॉजिस्टिक्स कॉस्ट कमी होतो. पायाभूत सुविधांवरील खर्चाचा वाढता आलेख हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ठरतो. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर आधारित विकासाला गती देण्यासाठी भांडवली खर्चात (कॅपिटल एक्स्पेंडिचर) मोठी वाढ करण्याची घोषणा केली आहे. आर्थिक वर्ष 2026-27 साठी सरकारने 12.2 लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च प्रस्तावित केला असून, चालू आर्थिक वर्षातील 11.2 लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ही लक्षणीय वाढ आहे. गेल्या दशकात सार्वजनिक गुंतवणुकीत झालेली ही वाढ थक्क करणारी असून, 2014-15 मधील 2 लाख कोटी रुपयांवरून हा प्रवास आता 11.2 लाख कोटी रुपयांच्या पार गेला आहे. यावेळच्या अर्थसंकल्पीय भाषणात शहरांच्या माध्यमातून आर्थिक विकासाला गती देण्यासाठी सरकारने 'सीटी इकॉनॉमिक रिजन' ही संकल्पना मांडली आहे. 5 लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने 'टियर-2' आणि 'टियर-3' शहरांचा समावेश असून, ही शहरे आता देशाची महत्त्वाची आर्थिक विकास केंद्रे म्हणून उदयास येत आहेत. या शहरांमध्ये पायाभूत सुविधांचे जाळे विणल्यामुळे केवळ नागरी जीवन सुसह्य होणार नाही, तर रोजगाराच्या मोठ्या संधीही निर्माण होतील. सरकारने या खर्चाद्वारे खासगी गुंतवणुकीला आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जेणेकरून अर्थव्यवस्थेची मागणी अधिक मजबूत होईल. देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग पाहिला तर चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर 7.4 टक्के राहण्याचा अंदाज आहे, तर महागाईचा दर 2 टक्क्यांच्या जवळ राहण्याची शक्यता आहे. सरकारने वित्तीय शिस्त पाळण्याचेही संकेत दिले असून, वित्तीय तूट जीडीपीच्या 4.4 टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. भांडवली खर्चाचा 'मल्टिप्लायर इफेक्ट' अधिक असतो. कारण रस्ते, रेल्वे, गृहनिर्माण आणि लॉजिस्टिक क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्रालाही मोठी चालना मिळते. सात नव्या रेल्वे कॉरीडॉरची घोषणा ही यामधील महत्त्वाची तरतूद म्हणावी लागेल. भारताची आर्थिक गती दुसऱ्या तिमाहीत 8.2 टक्क्यांपर्यंत पोहोचली असून, ही गेल्या सहा तिमाहीतील सर्वोच्च पातळी आहे. मागील दोन वर्षांतील 6.5 टक्के आणि 9.2 टक्के या वृद्धी दरांच्या तुलनेत ही कामगिरी आशादायक आहे. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्यासाठी पायाभूत सुविधांवरील हा खर्च अत्यंत कळीचा ठरणार आहे. जेव्हा खासगी क्षेत्रातील गुंतवणूक अपेक्षेप्रमाणे वेग घेत नाही, तेव्हा सरकारी खर्च हा अर्थव्यवस्थेसाठी मागणीचा मुख्य आधार ठरतो, हेच या निर्णयामागचे प्रमुख कारण आहे. गेल्या काही वर्षांतील आकडेवारी पाहिल्यास सरकारचा हा कल सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते. गेल्या दशकाच्या सुरुवातीला म्हणजेच 2016-17 मध्ये भारताचा भांडवली खर्च साधारणपणे 2.8 लाख कोटी रुपये इतका होता. पुढील काही वर्षांत यात संथ पण सातत्यपूर्ण वाढ दिसून आली. 2019-20 पर्यंत हा आकडा 3.4 लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला होता. मात्र कोविड-19 नंतरच्या काळात आर्थिक चक्राला गती देण्यासाठी केंद्र सरकारने भांडवली खर्चावर विशेष भर देण्याचे धोरण स्वीकारले. 2020-21 मध्ये हा खर्च 4.1 लाख कोटी रुपयांवर गेला आणि त्यानंतरच्या वर्षांत यात मोठी झेप पाहायला मिळाली. 2021-22 मध्ये भांडवली खर्च 5.9 लाख कोटी रुपये झाला जो 2022-23 मध्ये 7.4 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढला. 2023-24 च्या अर्थसंकल्पात सरकारने मोठी वाढ करत हा आकडा 10 लाख कोटी रुपयांच्या पार नेला. आर्थिक वर्ष 2025-26 च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च 11.21 लाख कोटी रुपये ठेवण्यात आला होता.

## संस्कृत सुभाषित

अमर्षजो हि संताप: पावकाद्दीप्तिमत्तर:
(वन पर्व, अध्याय ३५, ११, महाभारत)
अर्थ : असहिष्णुतेमुळे येणारा संताप
अग्निपेक्षाही जास्त प्रखर असतो.

## गुरु वचन

### दुसऱ्यांचे उपकार विसरू नका

इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली.

शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

बगळ्याला त्याची दया आली. त्याने लांडग्याला मदत करण्याचे ठरवले. तो त्या लांडग्या जवळ आला आणि त्याने त्या लांडग्याच्या घशात आपली चोच घालून आपल्या चोचीने ते अडकलेले हाड काढले. यानंतर त्या बगळ्याने त्याला आपले बक्षीस मागितले, परंतु त्या धूर्त लांडग्याने त्या बगळ्याला चकमा देत तो तेथून फरार झाला.

यानंतर काही दिवसांनंतर पुन्हा एकदा त्या लांडग्याच्या घशात हाडाचा एक तुकडा अडकला, त्याला पुन्हा बगळा दिसला, परंतु बगळ्याने यावेळेस त्याला मुळीच मदत केली नाही कारण यापूर्वी त्याच्यावर केलेल्या उपकारांना तो लांडगा विसरला होता. म्हणून लक्षात ठेवा कधीही दुसऱ्यांनी केलेल्या उपकारांना विसरू नका.

## उपदेशकथा

### वृथा अभिमान

एका गावातलं सरोवर पुष्कळ पाण्यानं भरलेलं असे. त्यातले मासे, कासव व इतर जलचर प्राणी सुखानं राहात. उन्हाळ्याची चाहूल लागली आणि त्यातलं पाणी हळूहळू आटू लागलं तेव्हा माशांनी नदीकडे जायचं ठरवलं. त्यातील एक कासव मात्र तिथंच राहिलं. त्याचे मित्र म्हणाले, 'उन्हाळ्यात सर्व पाणी आटून जाईल तेव्हा आताच आमच्याबरोबर चल कसा! कासव म्हणालं, 'माझी जन्मभूमी सोडून मी जाणार नाही. इथंच राहीन. मित्र त्याचं मन वळवू शकले नाहीत. त्याला सोडून सर्व मासे नदीकडे गेले. उन्हाळा आला. सर्व पाणी आटलं. सर्वत्र चिखल झाला. जन्मभूमी सोडून न जाण्याचा निश्चय करणारं कासव मात्र तिथंच चिखलात रुतून बसलं. कुणीतरी चिखल उकरू लागलं तसं कासवाचं कवच फुटलं आणि कासव वेदनेनं तळमळत राहिलं.

कथा उपदेश : काळाच्या पावलानुसार परिस्थिती ओळखायला हवी. तिथं वृथा अभिमान करता कामा नये.

## पंचांग

| पंचांग | नक्षत्र:मघा २२:१०:२५ |
| --- | --- |
| ३ फेब्रुवारी २०२५ | योग:शोभन २६:३८:३२+ |
| मंगळवार | करण:तैतिल १३:११:५८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर २४:४०:५४+ |
| माघ शके संवत्– १९४७ | सूर्य:मकर |
| संवत्सर – विश्वावसूनाम | चन्द्र:सिंह |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४५ |
| मास– माघ | मुस्लिम मास – शाबान |
| ऋतु– सौर शिशिर | तारीख – १४ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:द्वितीया २४:४०:५४+ | तुळसमापता पुण्यतिथी – घाटलाडकी (अचलपूर) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८४९

| | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | 8 | 2 | | | | | | 5 |
| 5 | | 4 | 7 | | | 6 | 3 | |
| | | 1 | | 9 | | | | 8 |
| | | | 3 | | | | | |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| | | | | | 9 | | | |
| 3 | | | | 1 | | 8 | | |
| | 5 | 9 | | | 6 | 7 | | 2 |
| 1 | | | | | | 4 | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४८ चे उत्तर

| | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 6 | 8 | 2 | 1 | 4 | 3 | 9 | 7 | 5 |
| 5 | 9 | 4 | 7 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |
| 7 | 3 | 1 | 6 | 9 | 5 | 2 | 4 | 8 |
| 9 | 4 | 6 | 3 | 5 | 8 | 1 | 2 | 7 |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| 8 | 1 | 5 | 2 | 7 | 9 | 3 | 6 | 4 |
| 3 | 2 | 7 | 5 | 1 | 4 | 8 | 9 | 6 |
| 4 | 5 | 9 | 8 | 3 | 6 | 7 | 1 | 2 |
| 1 | 6 | 8 | 9 | 2 | 7 | 4 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४५१ – मेहमेद तिसरा ओट्टोमान सम्राटपदी.
- १४८८ – बार्थोलोम्यु डायसने केप ऑफ गुड होपला वळसा घालुन मॉसेल बे येथे नांगर टाकला.
- १६९० – मासेच्युसेटसने अमेरिकेतील पहिले कागदी चलन वापरायला सुरूवात केली.
- १७८३ – अमेरिकन क्रांति – स्पेनने अमेरिकेचे स्वातंत्र्य मान्य केले.
- १८०९ – अमेरिकेत ईलिनॉय प्रांताची रचना.
- १८६७ – जपानचा युवराज मात्सुहितोचा सम्राट मैजी या नावाने राज्याभिषेक.
- १८७० – अमेरिकेच्या संविधानातील १५वा बदल अमलात. मतदानातील वंशभेद संपुष्टात.

### राष्ट्रीय

- २००८ – फैजाबाद जिल्ह्यात सरयू नदीच्या जमधरा घाटावर एक नाव अचानक नदीत उलटल्याने चार मुले आणि दोन महिलांसह नऊ जणांचा बुडून मृत्यू झाला.

### जन्म

- १८११ – होरेस ग्रीली, अमेरिकन पत्रकार, संपादक व प्रकाशक यांचा जन्म.
- १८३० – रॉबर्ट आर्थर टॅलबोट, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १८८७ – हुआन नेग्रिन, स्पेनचा पंतप्रधान यांचा जन्म.

### निधन

- १०१४ – स्वेन पहिला, डेन्मार्कचा राजा यांचे निधन.
- ११६ – कोलोमान, हंगेरीचा राजा यांचे निधन.
- १४५१ – मुराद दुसरा, ऑट्टोमन सम्राट यांचे निधन.
- १४६८ – योहान्स गटेनबर्ग, जर्मन प्रकाशक, स्वयंचलित मुद्रणाचा संशोधक यांचे निधन.
- १९२४ – वूड्रो विल्सन, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## : SMS :

Sardar was selling Parashut..
Plane se kudo,Button dabao aur aap zamin pe safe..
Custmer-Agar Parasdhut nhi Khula to..
Sardar-O ji le aana change kr dunga..

## हवामानाचा अंदाज

| | | |
| --- | --- | --- |
| औरंगाबाद | २७.५ | १८.३ |
| अहमदनगर | २७.४ | १८.२ |
| अकोला | ३०.१ | १८.७ |
| अमरावती | २८.९ | १७.४ |
| बीड | ३०.१ | १९.२ |
| भंडारा | २९ | १६.३ |
| बुलढाणा | १८.९ | ८.१ |
| चंद्रपूर | ३०.५ | १९.२ |
| चेन्नई | ३० | २१.६ |
| नवी दिल्ली | १८.७ | ७.८ |
| धुळे | ३०.४ | २०.८ |
| गोंदिया | २८.४ | १७.४ |
| जळगाव | २९.५ | १८.३ |
| कोल्हापूर | २८.३ | १६.८ |
| लातूर | २८.८ | १८.१ |
| मुंबई | ३०.३ | २४.३ |
| नागपूर | २८.३ | १६.८ |
| नांदेड | २९.२ | १८.९ |
| नंदूरबार | २८.९ | २० |
| नाशिक | २८.४ | १८.१ |
| पुणे | २७.४ | १४.९ |
| पंढरपूर | २९ | १७.९ |
| सातारा | २८.५ | १२ |
| सांगली | २९.१ | १६.६ |
| सोलापूर | २९.२ | १९.४ |
| वर्धा | २९.८ | १६.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम सरकारी कामे वेळेवर पूर्ण होण्याची शक्यता आहे. मौजमजा करण्याकडे कल वाढेल.

**तुळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण सत्कार्याची आवड निर्माण होईल. फायद्याचे अनेक मार्ग सापडतील.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम प्रतिष्ठित लोकांशी भेटी होतील ज्याचा फायदा भविष्यात आपल्याला मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण अपेक्षेपेक्षा जास्त फायदा झाल्यामुळे मन प्रसन्न राहील. विरोधकांपासून सावधान रहा.

**मिथुन :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर अचानक लाभ होऊन आपल्याला प्रसिद्धी मिळू शकते. व्यापारामुळे प्रवास होऊ शकतो.

**धनु :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व आप्तजन, मित्रांशी वाद होतील. दुसऱ्यावर विश्वास न ठेवता स्वत:च्या विचाराने काम करा.

**कर्क :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर विनम्रतेने आणि सामंजस्याने कामे केल्यास प्रत्येक कामात यश मिळण्याचा योग आहे.

**मकर :** शुभ रंग : पांढरा,शुभ दिशा:उत्तर एखादी आनंदाची बातमी मनाची प्रसन्नता वाढवील. मुलांसंबंधातील कामात प्रगती होईल.


**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण शुभ, मंगल नोकरी, राज्यपक्षात अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. घरात एखाद्याशी मतभेद होतील.

**कुंभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण नवीन संबंध निर्माण होतील. सदभाव ठेवा योग्य फळ मिळेल. व्यापारामध्ये विस्तार होण्याचे योग आहेत.

**कन्या :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण काम करण्याच्या स्थितीत सुधारणा होईल. जवळच्या व्यक्तिच्या आरोग्याची काळजी राहील.

**मीन :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर उद्योगधंदा साधारण राहील. प्रयत्न अधिक केल्यास कामात जास्तीचे यश मिळू शकते.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४९



### आडवे शब्द

१. सुबक, सुरेख
३. पुष्कळ
६. वेगवेगळे
१०. नेमाने यात्रा करणारा
१२. अंगावरील रोम
१३. डोंगर, किल्ला
१४. बडबड्या
१६. दानशूर
१८. नवलाची कामगिरी
२०. आगटी
२१. नंतर
२२. तात्पर्य
२३. बासुंदीला उगीच शह दे पाहणारे मिष्टान्न
२४. ठीक, व्यवस्थित
२५. सर्वत्र
२९. कचरा
३१. खोड्या करण्याचा स्वभाव
३३. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
३५. शंभर
३७. उसाचा सोललेला तुकडा
३९. अटीची भाषा
४१. चप्पल
४३. रसाळ
४७. अत्यंत मुलायम कापड
४८. घर
४९. संथपणे, सावकाशीने
५२. कमळ
५४. पुरुष
५५. पालिकेतील लोकप्रतिनिधी
५९. शेराचा चौथा भाग
६१. उलटीपूर्वीची स्थिती
६२. नासाडी, नाश
६३. टरफल
६४. गवताचे पान
६५. चेहरा
६७. होकाराच्या विरुद्ध
६८. हिंदीत मीठ
७०. गुंडाळी
७१. पुष्परस
७३. आश्चर्य
७५. धमनी
७६. मोल करता येणार नाही असे
७८. वंदन
८०. संरक्षण करणारा
८३. एक शेंगभाजी
८५. कर्णधार, संघनायक
८६. रागाने भराभर चालणे
८७. दारू
८८. वेदना
८९. गाणी

### उभे शब्द

१. एखादे संकट आपोआप दूर होणे (वा.प्र.)
२. कणीदार
३. हेलपाटा, यात्रेस जाणे
४. श्रीमंत
५. वारा, वायू
६. उदबत्ती
७. रेशमाची गुंडाळी
८. गुन्हा
९. तृण
११. अनामिकेच्या शेजारचे बोट
१५. वर्तन, रीत
१७. शूर
१९. माठ
२१. सुसर
२२. शनिचा फेरा
२५. सुकुमार
२६. चषक
२७. तर्क, ठोकताळा
२८. शेवट
३०. प्रिय, श्रीविष्णु
३२. भीती, ३४. मऊ
३५. लाज, ३६. मिठी
३८. छोटेसे पौष्टिक फळ
४०. समशेर
४२. सोने
४४. अखेरीस
४५. रत्न
४६. इटलीची राजधानी
५०. उष्ण
५१. हे सर्व म्हणजे सर्वस्व
५२. चिखल
५३. अतिशय तीव्र
५६. वेगाने झिरपणारा माठ
५७. सैन्य
५८. वस्त्र, कापड
५९. सरसरीत
६०. दात
६३. छोटा लाकडी पूल
६४. पवित्र
६६. नटणारा मनुष्य
६९. हृदय काबीज करणे
७२. घटस्फोट
७४. छोटा, बारीक
७७. सत्ता
७९. चार आठवडे
८१. छिद्र, जखम
८२. मडके
८४. तेज, कांती

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.जास्वंद ३.कसब ५.सनसनाटी ९.पोळा १०.रमणी ११.डमडम १२.थकावट १४.गारवा १६.कसब १८.कनक २०.कानशील २२.रमजान २४.दडविणे २५.समर २७.रवानगी २९.मदार ३०.वहाण ३१.जयजवान ३३.तप ३५.सरगम ३६.नहर ३७.दलाल ४०.जनमन ४२.रजत ४३.सरबत ४४.महान ४५.पालक ४६.कारले ४९.हाट ५०.आवरण ५१.लव ५२.रजक ५३.माळवा ५५.उमा ५६.विघ्न ५७.रुपाया ५९.चरा ६१.माता ६२.बदक ६३.विना ६५.कनात ६६.लारा दत्ता ६८.तज ७०.तुलसीदास ७२.लवाजमा ७४.रसा ७५.रद ७६.मूल ७६अ.आटप ७७.अंत ७८.पुन्हा ७९.राणी ८०.थारा ८१.अलवारपणे

उभे उत्तर : १.जादूगार २.दरवाजा ३.कणीक ४.बडबडगीत ५.सडकणे ६.नमन ७.नाथ ८.टीकाकार ९.पोटशी १३.वन १५.रमणीय १७.सदन १९.कसदार २१.लक्ष्मण भरत शत्रुघ्न २३.नरवाहन २६.मरगळ २८.वानर २९.मसलत ३१.जयजयकार ३२.जनम ३४.पदर ३८.लाजलावणा ३९.खर ४१.चहाटळ ४३.सकल ४४.महामाया ४५.पाणउतारा ४७.रज ४८.लेकरु ५४.वाचनालय ५६.विकत ५८.पाणीदार ६०.रातवा ६१.मालामाल ६२.बत्तासा६३.वितुष्ट ६४.नाल ६७.दरसाल ६९.दडपणे ७१.सदरा ७३.जमूरा ७६अ.आर ७७.टप

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चक्कर मारून येतो...' दुचाकी घेऊन चोरटा फरार, व्यावसायिकाची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : जुनी वाहने खरेदी-विक्री व्यवहार करणाऱ्या व्यावसायिकाकडे बतावणी करून चोरटा दुचाकीसह पसार झाल्याची घटना हडपसर भागात घडली. या प्रकरणी चोरट्याविरोधात काळेपडळ पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत व्यावसायिकाने काळेपडळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यावसायिकाचा जुनी वाहने खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. हडपसरमधील सय्यदनगर परिसरात व्यावसायिकाचे दुकान आहे. ३० जानेवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास चोरटा दुचाकी खरेदीच्या बहाण्याने दुकानात आला. त्याने व्यावसायिकाकडे दुचाकी खरेदी करण्याची बतावणी केली. एक लाख ४० हजार रुपयांना दुचाकी खरेदीचा व्यवहार त्याने केला. त्यानंतर दुचाकीवरून चक्कर मारून येतो, असे सांगून तो दुचाकी घेऊन पसार झाला. दुचाकी घेऊन चोरटा पसार झाल्याचे लक्षात आल्यानंतर व्यावसायिकाने पोलिसांकडे तक्रार दिली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक संदीप राऊत करत आहेत.



### हायस्पीड मार्गामुळे पुणे-मुंबई दीड तासात तर हैद्राबादला 4 ते 5 तासात जाण्याची शक्यता

पुणे (दैनिक संध्या) : मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद या दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन/सेमी हायस्पीड) रेल्वे कॉरिडॉर बनवणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी रविवारी सादर केलेल्या अंदाजपत्रकात केली. या दोन प्रकल्पांमुळे रेल्वे प्रवासाचा वेळ कमी होणार असून, दळणवळणाचा वेग वाढणार आहे. यामुळे आयटी, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राशी संबंधित प्रवाशांना मोठा फायदा होणार असून, हायस्पीड मार्गामुळे पुणे-मुंबई दरम्यानचे अंतर केवळ एक ते सव्वा तासात गाठता येणार आहे. हायस्पीड रेल्वे मार्ग भारतीय हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. पुणे-मुंबई दरम्यान सध्या रेल्वे किंवा रस्तेमार्गे प्रवासासाठी सुमारे ४ ते ५ तास लागतात. प्रस्तावित हायस्पीड रेल्वेमुळे हा प्रवास अवघ्या एक ते सव्वा तासांत होऊ शकते. तसेच पुणे ते हैदराबाद दरम्यान रेल्वे प्रवासाला आठ ते दहा तास वेळ लागतो. हायस्पीड रेल्वे मार्ग झाल्यावर चार ते साडेचार तासांत प्रवास होण्याची शक्यता आहे. पुणे ते हैदराबाद मार्गामुळे महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांमधील औद्योगिक, व्यापारी व्यवसायाला चालना मिळणार आहे. या रेल्वेसाठी स्वतंत्र लोहमार्ग टाकण्यात येणार आहे. केंद्राकडून मंजुरी मिळाल्यामुळे या प्रकल्पासाठी मार्गाची पाहणी, तांत्रिक अभ्यासाच्या आढावाला गती मिळणार आहे. या दोन मार्गांसह इतर पाच हायस्पीड मार्गांची घोषणा झाल्यामुळे आराखड्यास (डीपीआर) तयार करण्यासाठी लवकरच ग्रीन सिग्नल मिळेल.

### केंद्रीय बजेटमध्ये पुण्याला 2 रेल्वे कॉरिडॉर आणि पुणे मेट्रोसाठी 517 कोटी

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र सरकारच्या २०२६-२०२७च्या अंदाजपत्रकात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशात सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित केल्याचे जाहीर केले आहे. त्यात मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद या दोन रेल्वे कॉरिडॉरचा समावेश आहे. पण हे दोन रेल्वे कॉरिडॉर आणि पुणे मेट्रोसाठी ५१७ कोटी वगळता या अर्थसंकल्पात पुण्यासाठी ठोस असे काही मिळाले नाही. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी रविवारी आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीचा केंद्रीय अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पात पुण्यासाठी विशेष घोषणा केली जाण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात अर्थमंत्र्यांच्या पूर्ण अर्थसंकल्पीय भाषण तब्बल ९५ मिनिटे म्हणजेच १ तास २५ मिनिटांचे होते. या भाषणात ७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणाही त्यांनी केली. त्यावेळी या कॉरिडॉरची नावे घेताना सीतारामन यांनी दोन वेळा पुण्याचा उल्लेख केला. पर्यावरणदृष्ट्या शाश्वत सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी महानगरांना जोडणारे सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर विकसित केले जातील हे कॉरिडॉर महानगरांना एकमेकांशी जोडून देशाची वाटचाल विकासाकडे अधिक वेगाने होण्यास मदत करतील. त्यात मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बंगळूरू, हैदराबाद ते चेन्नई, चेन्नई ते बंगळरू, दिल्ली ते वाराणसी आणि वाराणसी ते सिलिगुडी या सात रेल्वे कॉरिडॉरचा समावेश आहे. हे दोन रेल्वेचे कॉरिडॉर तयार केले जाणार आहेत. हे दोन रेल्वेचे कॉरिडॉर आणि पुणे मेट्रोसाठी ५१९ कोटी वगळता पुणे शहराला ठोस असे काही मिळाले नाही.

### केंद्रीय अर्थसंकल्पावर रिअल इस्टेट क्षेत्राची संमिश्र प्रतिक्रिया

पुणे (दैनिक संध्या) : यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे रिअल इस्टेट क्षेत्रातील तज्ज्ञांकडून संमिश्र स्वरूपात स्वागत होताना दिसते. टियर 2 आणि टियर 3 स्तरावरील शहरांसाठी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदींचे स्वागत करतानाच गृहखरेदीसाठी थेट करसवलती तसेच प्रोत्साहनात्मक घोषणा न करणे, परवडणाऱ्या घरांसाठी अर्थसंकल्पात काहीही ठोस तरतूद नसणे, याकडे बांधकाम व्यवसाय क्षेत्रातील तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे.अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांसाठी वाढविण्यात आलेला सार्वजनिक भांडवली खर्च, सिटी इकॉनॉमिक रिजनची संकल्पना आणि उच्चगती रेल्वे प्रकल्प, यांमुळे देशातील शहरी आणि निमशहरी भागांमध्ये आर्थिक हालचालींना वेग मिळणार आहे. विशेषतः टियर 2 आणि टियर 3 शहरांमध्ये गृहनिर्माण, व्यावसायिक जागा आणि एकात्मिक टाईनशिप्ससाठी वाढती मागणी निर्माण होईल, असा विश्वास आहे. वाढते उत्पन्न, सुधारलेली दळणवळण व्यवस्था आणि रोजगाराच्या संधी, यामुळे या शहरांचा रिअल इस्टेट नकाशावर अधिक ठसा उमटेल. मुंबई-पुणे मार्गासह प्रस्तावित उच्चगती रेल्वे कॉरिडॉरसारख्या तरतुदीमुळे प्रादेशिक कनेक्टिव्हिटी सुधारून विकास कॉरिडॉरच्या आसपास नव्या निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांना चालना मिळेल.

# बेकायदेशीर रसायनांचा वापर केल्यामुळे 'कॉम्फर्ट' अगरबत्तीवर बंदी

पुणे (दै. संध्या) :

भारतामध्ये घरगुती कीटकनाशकांच्या सुरक्षित वापरास प्रोत्साहन देणाऱ्या ना-नफा तत्वावरील उद्योग मंडळ होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन (HICA) तर्फे बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्ती 'कॉम्फर्ट' विरोधात महाराष्ट्र सरकारने केलेल्या कारवाईचे स्वागत करण्यात आले आहे. 'कॉम्फर्ट' ही डास प्रतिबंधक अगरबत्ती महाराष्ट्र, तमिळनाडू, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथे विक्रीस उपलब्ध असून ती मेसर्स धूप छांव कंपनी यांचे उत्पादन आहे. खुल्या बाजारातून गोळा करण्यात आलेल्या नमुन्यांवरून हे उत्पादन अनभिज्ञ ग्राहकांकडून खरेदी केले जात असल्याचे स्पष्ट झाले असून, महाराष्ट्र कृषी विभागाने केलेल्या प्रयोगशाळा चाचण्यांमध्ये 'कॉम्फर्ट' मध्ये बेकायदेशीर आणि मान्यता नसलेले रसायन डाइमफ्लुथ्रिन आढळून आले आहे. 'कॉम्फर्ट' अगरबत्त्या मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक




तसेच उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रात विक्रीस असल्याचे सांगितले जाते.

मुंबईमध्ये टाकण्यात आलेल्या छाप्यादरम्यान अधिकाऱ्यांना डाइमफ्लुथ्रिन असलेल्या 'कॉम्फर्ट' अगरबत्त्यांचे अनेक बॉक्स आढळून आले. धूप छांव कंपनी कडे परवाना तसेच CIBRC मान्यता या दोन्ही गोष्टी नसल्यामुळे, कीटकनाशके अधिनियम, 1968 आणि कीटकनाशके नियम, 1971 अंतर्गत या उत्पादनाचे उत्पादन व विक्री बेकायदेशीर ठरते.

हर्बल असल्याचा खोटा दावा करत अनेक बेकायदेशीर अगरबत्त्या विक्रीस आणल्या जात असून, त्यामध्ये बेकायदेशीर आणि शासनमान्य नसलेली रसायने वापरली जात आहेत. 'कॉम्फर्ट', 'स्लीपवेल' आणि 'रिलॅक्स' या नावांनी विक्री होणारी उत्पादने यामध्ये ओळखली गेली आहेत. यामुळे भारतभर मान्यता नसलेली कीटकनाशके असलेल्या बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्त्यांविरोधात अंमलबजावणी कारवाईत वाढ झाली असून, नियामक सतर्कता आणि सार्वजनिक आरोग्याबाबतची चिंता अधिक तीव्र होत असल्याचे दिसून येते.

कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय यांच्या अंतर्गत कार्यरत असलेली केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समिती (CIBRC) ही वैधानिक संस्था असून, भारतात डास प्रतिबंधकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रसायनांना उत्पादन, आयात किंवा विक्रीपूर्वी मंजुरी व नोंदणी देण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. शासनमान्य CIBRC-मान्यताप्राप्त डास प्रतिबंधक उत्पादनांवर नोंदणी क्रमांक (CIR – Central Insecticide Registration number पासून सुरू होणारा) पॅकवर स्पष्टपणे नमूद केलेला असतो. त्यामुळे ग्राहकांना उत्पादनाची सत्यता तपासता येते आणि सुरक्षित उत्पादने निवडता येतात.

डाइमफ्लुथ्रिन आणि मेपरफ्लुथ्रिन यांसारखी रसायने CIBRC कडून मंजूर नसल्यामुळे, त्यांचा डास प्रतिबंधक अगरबत्त्यांमध्ये वापर करणे हा बेकायदेशीर प्रकार आहे. तसेच, कोणतेही शासनमान्य डास प्रतिबंधक उत्पादन CIBRC कडून मंजुरी मिळण्यापूर्वी कठोर चाचणी प्रक्रियेतून जाते.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन (HICA)चे मानद सचिव जयंत देशपांडे म्हणाले, "कॉम्फर्टसारख्या बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्त्यांविरोधात महाराष्ट्र सरकारने वेळेवर केलेल्या ठोस कारवाईचे आम्ही मनापासून कौतुक करतो. अगरबत्ती स्वरूपातील प्रतिबंधकांमध्ये डाइमफ्लुथ्रिनसारख्या बेकायदेशीर व मान्यता नसलेल्या रसायनांचा गैरवापर होणे अत्यंत चिंताजनक असून यामुळे सार्वजनिक आरोग्याला संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो. अशा उत्पादनांची जाणीवपूर्वक कोणतीही नियामक मंजुरी न घेता विक्री केली जाते आणि ग्राहकांमध्ये ती उत्पादने सुरक्षित असल्याचा गैरसमज निर्माण केला जातो. ही कारवाई नकळत बनावट डास प्रतिबंधक अगरबत्त्या खरेदी करणाऱ्या लोकांच्या हितासाठी आहे. या सरकारी कारवाईमुळे बेकायदेशीर उत्पादक आणि त्यांच्या वितरणास मदत करणाऱ्यांना सहन केले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश मिळतो. आम्ही सर्व राज्यांमध्ये सातत्यपूर्ण कारवाईची मागणी करतो आणि ग्राहकांना केवळ वैध CIBRC नोंदणी क्रमांक असलेली डास प्रतिबंधक उत्पादनेच खरेदी करण्याचा सल्ला देतो."

गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी 'स्लीपवेल' या ब्रँड नावाखाली विक्री होणाऱ्या 69 लाख रु. किमतीच्या बेकायदेशीर डास प्रतिबंधक अगरबत्त्या जप्त केल्या होत्या. या अगरबत्त्यांमध्ये मेपरफ्लुथ्रिन आढळून आले होते. हे केंद्रीय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समिती (CIBRC) कडून मंजूरी नसलेले कीटकनाशक आहे. होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन (HICA) नियामक संस्था आणि अंमलबजावणी यंत्रणांसोबत निकट सहकार्य सुरू ठेवेल. त्यायोगे बेकायदेशीर उत्पादनांविरोधात कारवाईला पाठबळ देता येईल आणि ग्राहकांना सुरक्षित व नियमांचे

## मुंबईत रोहित शेट्टी यांच्या घरावर गोळीबार

पुणे (दै. संध्या) :

प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घरावर गोळीबार करणाऱ्या पाच जणांना वारजे पोलिसांनी पहाटे जेरबंद केले आहे. अमन आनंद मराठे (वय २७), आदित्य ज्ञानेश्वर गायके (१९), सिद्धार्थ दीपक येनपुरे (२०), समर्थ शिवशंकर पोमाजी (१८) आणि स्वप्निल बंडू सकट (२३) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत.

मुंबईतील जुहू परिसरातील रोहित शेट्टी यांच्या इमारतीबाहेर अज्ञात व्यक्तीने गोळीबार केल्याचा प्रकार शनिवारी रात्री घडला होता. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झाली नाही. या घटनेनंतर इमारतीबाहेर सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. या घटनेची माहिती मिळताच मुंबईपोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी १२

**पुण्यातून ५ जणांना वारजे पोलिसांनी केले जेरबंद**

जणांचे पथक स्थापन केले होते. या पथकाने घटनास्थळापासून सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. त्यात एकजण बाजूला मोटारसायकल लावून इमारतीसमोर चालत येतो, इमारतीवर पाच गोळ्या झाडतो आणि चालत परत मोटारसायकलपर्यंत येऊन त्यावरून निघून जातो, असे सीसीटीव्हीमध्ये दिसून आले आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने याचा तपास हाती घेतला. संशयितांचे लोकेशन पुणे शहरातील वारजे परिसरात असल्याचे दिसून आले. मुंबई गुन्हे शाखेने वारजे पोलिसांशी संपर्क साधून त्याबाबत माहिती दिली. वारजे पोलिसांनी कर्वेनगरमधून ५ जणांना ताब्यात घेतले. त्यांना मुंबई गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

### एण्ड टीव्हीची नवी आध्यात्मिक विनोदी मालिका 'हे भगवान – कितना बदल गया इंसान!'

## जयशंकर त्रिपाठी साकारणार प्रामाणिक वकिलाची भूमिका

पुणे (दै. संध्या) :

ॲण्ड टीव्हीने हलके-फुलके, अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी मनोरंजन देण्याची आपली परंपरा कायम ठेवत प्रेक्षकांसाठी नवी आध्यात्मिक विनोदी मालिका हे भगवान - कितना बदल गया इंसान! लवकरच सादर करण्याची तयारी केली आहे. पवित्र उज्जैन शहराच्या पार्श्वभूमीवर आधारित ही मालिका दैनंदिन जीवनातील विनोदी प्रसंग, कौटुंबिक गोंधळ आणि आध्यात्मिक ट्विस्ट्स यांचे रंजक मिश्रण प्रेक्षकांसमोर आणणार आहे.

या मालिकेत अभिनेता जयशंकर त्रिपाठी मुख्य भूमिकेत दिसणार असून, ते महेश कुमार शर्मा या प्रामाणिक वकिलाची भूमिका साकारणार आहेत. सत्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणावर ठाम विश्वास असलेला महेश, शॉर्टकट्स आणि अर्धसत्यांनी भरलेल्या जगात



वेगळाच ठरतो. 'उज्जैनचा हरिश्चंद्र' म्हणून ओळखला जाणारा महेश आपल्या प्रामाणिक स्वभावामुळे घरात, कोर्टात आणि समाजात अनेक मजेशीर, गोंधळयुक्त परिस्थितींमध्ये अडकतो.

कथेला अनपेक्षित वळण मिळते, जेव्हा भगवान शिव प्रत्यक्ष पृथ्वीवर अवतरतात. त्यानंतर महेशच्या आयुष्यात सुरू होतो एक हृदयस्पर्शी आणि विनोदी प्रवास, जो त्याच्या भोवतालच्या लोकांना दयाळूपणा, आत्मपरीक्षण आणि सत्याच्या मार्गाकडे वळण्याची प्रेरणा देतो.

भूमिकेबद्दल जयशंकर त्रिपाठी काय म्हणतात?

या मालिकेत काम करण्याबाबत आनंद व्यक्त करत जयशंकर त्रिपाठी म्हणाले,

"महेश कुमार शर्मा ही मी आजवर साकारलेल्या भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळी व्यक्तिरेखा आहे. तो कधीही खोटे बोलत नाही; अगदी कोणाचे नुकसान न करणारे छोटेसे खोटेही त्याला अस्वस्थ करते. आजच्या काळात प्रामाणिकपणा जपणे कठीण झाले असताना, अशा व्यक्तीची भूमिका साकारणे आव्हानात्मक आणि तितकेच समाधानकारक आहे."

ते पुढे म्हणाले, "या मालिकेचे वैशिष्ट्य म्हणजे विनोदाच्या माध्यमातून सत्य, निष्ठा, नैतिकता आणि मानवी विरोधाभास अत्यंत सहजपणे मांडले जातात. कोणताही उपदेश न करता. महेश देवाकडे मदत मागत नाही, उलट तोच देवाला मदत करतो, आणि हीच त्याची निरागसता या मालिकेचे खरे आकर्षण आहे. प्रतिभावान कलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव खरोखरच अविस्मरणीय आहे."

प्रेमळ पात्रे, वेगळे कथानक आणि आध्यात्मिक विनोदी टच यामुळे ही मालिका कुटुंबासोबत बसून पाहण्यासारखी ठरणार आहे. प्रामाणिकपणा आणि अध्यात्म एकत्र आले तर आयुष्य किती सुंदर होऊ शकते, हे ही मालिका हलक्याफुलक्या शैलीत मांडणार आहे.

पहा 'हे भगवान – कितना बदल गया इंसान!' लवकरच ॲण्ड टीव्हीवर आणि हिंदी ZEE5 वर.

## १८ महिन्यांनंतर तिघांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

पुणे (दै. संध्या) :

पुण्यातील बहुचर्चित कल्याणीनगर पोर्शे कार अपघात प्रकरणात आज सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. रक्ताचे नमुने बदलल्याचा आरोप असलेल्या तीन प्रमुख आरोपींना न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. सुमारे १८ महिने तुरुंगात राहिल्यानंतर या तिघांची सुटका होणार आहे.

न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने खालील तिघांना जामीन मंजूर केला आहे. यामध्ये आदित्य अविनाश सूद हा कारमध्ये मागे बसलेल्या एका मुलाचे वडील आहेत. दुसरा आशिष सतीश मित्तल, हा मुख्य आरोपीच्या वडिलांचा



मित्र आहे आणि रक्ताचे नमुने बदलण्यासाठी ३ लाख रुपयांची लाच घेणारा कथित मध्यस्थ अमर संतोष गायकवाड आहे.

जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने काही गंभीर टिप्पणी केली आहे. आरोपी गेल्या १८ महिन्यांपासून तुरुंगात आहेत. गुन्ह्यातील शिक्षेचा विचार करता, त्यांना अधिक काळ कोठडीत ठेवणे त्यांच्यावर अन्यायकारक ठरेल, असे म्हटले आहे. तसेच न्यायमूर्ती नागरत्ना यांनी पालकांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "मुलांना चैनीसाठी पैसे आणि गाडीच्या चाव्या देणे अयोग्य आहे. पालकांना मुलांसाठी वेळ नसतो आणि ते त्याची भरपाई पैशांनी करतात, हे सामाजिक वास्तव चिंताजनक आहे," असे न्यायालयाने म्हटले.

आरोपींना पुराव्यांशी छेडछाड न करण्याच्या आणि तपासात पूर्ण सहकार्य करण्याच्या अटीवर जामीन देण्यात आला आहे.

१९ मे २०२४ रोजी रात्री पुण्यात कल्याणीनगर येथे एका अल्पवयीन बिल्डर पुत्राने सुसाट वेगात पोर्शे कार चालवून दोघा आयटी इंजिनीअर्सचा (अनीश अवधिया आणि अश्विनी कोस्टा) जीव घेतला होता. या अपघातानंतर मुख्य आरोपीला वाचवण्यासाठी त्याचे रक्ताचे नमुने स्वतःच्या रक्ताशी बदलल्याचा आरोप या तिघांवर होता.

## केंद्रीय अर्थसंकल्पात दीर्घकालीन विकासाचा स्पष्ट ठसा

पुणे (दै. संध्या) :

भांडवली खर्चातील वाढ, वित्तीय तूट कमी करण्यासाठी उचललेली पावले, कर्जभार कमी करण्यासाठी केलेले नियोजन, सेमीकंडक्टर, ऊर्जा, सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग (एमएसएमई), पर्यटन आणि आयटी उद्योगाला चालना देण्यासाठी घेतलेले निर्णय, यामुळे केंद्रीय अर्थसंकल्पात दीर्घकालीन विकासाचा ठसा स्पष्टपणे उमटला असल्याची प्रतिक्रिया मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर (एमसीसीआयए) च्या चर्चासत्रात उमटली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पानंतर विविध उद्योग घटकांनी आपली मते व्यक्त केली.

एमसीसीआयएचे माजी अध्यक्ष प्रदीप भार्गव म्हणाले, चालू वर्षी वित्तीय तूट 4.4 टक्क्यांवर येईल, तर 2026-27मध्ये वित्तीय तूट 4.3 टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) कर्जाचे प्रमाण 55 वरून 51 टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट आहे. वित्तीय शिस्त आणण्याचे सरकारचे सकारात्मक प्रयत्न दिसून येत आहे. याशिवाय सेमीकंडक्टर, बायोफार्मसी व पायाभूत सुविधांसाठी 10 टक्के वाढीव तरतूद महत्त्वाची ठरेल. एमएसएमईच्या अनेक मागण्या मान्य झाल्याने रोजगारवाढीस चालना मिळेल. अर्थसंकल्पात कोठेही मोठे धक्के नाहीत. रस्ते-रेल्वे अशा पायाभूत सुविधांसाठी केलेली तरतूद स्वागतार्ह आहे.

# पुण्यातील महादेववाडी-उंड्री परिसरात पिण्याच्या पाण्यात अळ्या

**नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण**





पुणे (दै. संध्या) :

पुणे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ४१ अंतर्गत येणाऱ्या महादेववाडी-उंड्री परिसरातील घुलेनगरमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर अळ्या आढळून आल्याचे समोर आले. पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यावश्यक सेवेत झालेल्या या गंभीर त्रुटीमुळे आरोग्यावर थेट परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिसरात तीव्र चिंता व संतापाचे वातावरण आहे. तसेच सर्व्हे क्रमांक १२ परिसरात मलनिस्सारण वाहिनीमधील सांडपाणी काही घरांमध्ये शिरत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या परिस्थितीमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व महिला यांच्या आरोग्यास संसर्गजन्य आजारांचा धोका संभवत आहे. संबंधित विभागाकडून वेळेवर देखभाल व दुरुस्ती न झाल्यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात शिंदेसेनेचे शहर प्रमुख प्रमोद भानगिरे यांच्या नेतृत्वाखाली पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यात आले. त्यामध्ये महादेववाडी परिसरात तातडीने स्वच्छ व निर्जंतुक पिण्याच्या पाण्याचा पर्यायी पुरवठा सुरू करणे, विद्यमान पाणीपुरवठा वाहिन्यांची तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करणे तसेच ड्रेनेज व्यवस्थेतील बिघाडावर त्वरित कायमस्वरूपी उपाययोजना करणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या प्रकरणी पुढील दोन दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास पुणे महापालिका आयुक्तांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पाणी गढूळ येत असल्याची तक्रार आम्ही करत होतो. प्रत्यक्ष पाण्यात अळ्या दिसल्यावर धक्का बसला. हेच पाणी पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी वापरले जाते. लहान मुलांचे आणि ज्येष्ठांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेने तातडीने स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी.

**- संगीता नलावडे, स्थानिक रहिवासी**

वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही. आजारी पडल्यावर जबाबदारी कोण घेणार ? जर लवकर उपाययोजना झाल्या नाही, तर आम्ही देखील आंदोलनात सहभागी होणार आहोत.

**- आनंद माने, स्थानिक रहिवासी**

# पुण्यात एडब्ल्यूआरटी फेस्टीव्हलला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पुणे (दै. संध्या) :**

पालवीया फाऊंडेशन व भाग्यशाली भविष्य शिक्षण फाऊंडेशन यांच्या सहकार्याने 31 जानेवारी आणि 1 फेब्रुवारी 2026 दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या एडब्ल्यूआरटी या कला महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हा महोत्सव पुण्यातील गेणू भाऊ खेसे प्राथमिक विद्यालय,बर्मा शेल वस्ती,509 चौक, एअरपोर्ट रोड येथे पार पडला. या महोत्सवाला बालग्राम एसओएस चिल्ड्रन्स व्हिलेज, आर्टेंट एज्युकेशन फाऊंडेशन,रसाथी स्कुल ऑफ डान्स, स्लॅम आऊट लाऊड,बैठक फाऊंडेशन,स्कुल ऑफ फाइन आर्टस् अॅन्ड अप्लाईड आर्टस -एमआयटी एडीटी या भागीदारांचा सहयोग लाभला. या महोत्सवाचे उद्घाटन नगरसेविका ऐश्वर्या पठारे, नवज्योती इंडिया फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष साईना भरूचा व अमुक-तमुकचे सहसंस्थापक ओमकार जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

एडब्ल्यूआरटी हा वंचित मुलांसाठी एक वस्तीमध्ये आयोजित केलेला एक कला महोत्सव असून या फेस्टीव्हलमध्ये कलेच्या माध्यमातून विकासाचा सर्वसमावेशक उत्सव साजरा करण्यासाठी लहान मुले,कलाकार आणि समुदाय एकत्र आले होते.

यंदाच्या महोत्सवात बर्मा शेल वस्तीबरोबरच बालग्राम एसओएस चिल्ड्रन्स व्हिलेज,पर्णकुटी तसेच इतर वंचित समुदायातील मुलांनी सहभाग घेतला होता. यामध्ये अनाथाश्रमातील मुलांचाही समावेश आहे.या महोत्सवात बालपणातील विविध अनुभव एकाच मंचावर सामुहिक व कलात्मक पध्दतीने अनुभवता आले.

या दोन दिवसीय महोत्सवात बर्मा शेल बस्ती आणि इतर आसपासच्या परिसरातील कलाकारांचे सादरीकरण तसेच मुलांचे नृत्य,सामुहिक गीत सादरीकरण,कथानाट्य, सर्जनशील विचार व कलात्मक अभिव्यक्ती,मास्क मेकिंग आणि मेमरी पपेट यांच्या कार्यशाळा,सितार वादन,भरतनाट्यम व मोहिनी अट्टम,रॅप सादरीकरण आणि लाईव्ह बँड परफॉर्मन्स अशा विविध कलाकृतींचे प्रदर्शन पाहण्याचा अनुभव घेता आला. बर्मा शेल वस्ती येथील नर्सिंग विद्यार्थिनी सानिया शेख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या दोन दिवसीय महोत्सवात वंचित समुदायातील मुलांनी तयार केलेली चित्रे आणि कलाकृती प्रदर्शित करण्यात आल्या.

## जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.
## जाहीर निवीदा/नोटीस

जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे आस्थापनेवरील अति. जिल्हा व सत्र न्यायालय, राजगुरुनगर-खेड, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राजगुरुनगर-खेड, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, वडगांव-मावळ, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वडगांव-मावळ तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय वडगांव मावळ व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, दौंड, अति. जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, जुन्नर, अति. जिल्हा व सत्र न्यायालय इंदापूर, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, इंदापूर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय जुन्नर व इंदापूर व दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, पौड ता. मुळशी जि. पुणे आणि अति. जिल्हा व सत्र न्यायालय पिंपरी चिंचवड, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पिंपरी चिंचवड व शासकीय अभियोक्ता कार्यालय पिंपरी चिंचवड जि. पुणे, अति. जिल्हा व सत्र न्यायालय घोडनदी शिरुर, दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, घोडनदी शिरुर व शासकीय अभियोक्ता कार्यालय घोडनदी शिरुर जि. पुणे या न्यायालय करीता बाहययंत्रणेद्वारे कंत्राटीपध्दतीने वाहन चालक, शिपाई, पुस्तक बांधणीकार, न्यायालय परिरक्षक, पहारेकरी, सफाईगार अशी भरावयाची एकूण ६९ पदे आउटसोर्सिंगचे त-त्वांवर दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करार करणेसाठी, ई-निवीदा पध्दतीचा अवलंब करुन ई-निवीदा मागविणेकरीता आवश्यक जाहीर निवीदा/नोटीसीचा मसुदा /फॉर्म व त्या सोबतच्या विशेष सुचना/अटी व शर्तीची यादी असा सर्व तपशिल हा ई-निवीदा प्रणालीद्वारे सोमवार दिनांक ०२.०२.२०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या WWW.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसारीत करण्यात येत आहे. तसेच सदर ई-निवीदा हि दिनांक ०२.०२.२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दिनांक १६.०२.२०२६ रोजी सायं. १७:०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल व सदर ई-निविदा दि. ०२.०२.२०२६ ते १६.०२.२०२६ रोजी सायं. १७:०० वाजेपर्यंत सादर करता येईल.

सही/-
हुकूमावरुन,
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे

पुणे.
दिनांक :- २३.०१.२०२६.
क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C5504

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २३ हजार मनुष्यबळाची नियुक्ती : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी



**पुणे (दै. संध्या) :**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या कामकाजाकरिता जिल्ह्यात १३ तालुक्यात एकूण २३ हजार ११४ मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

बारामती तालुक्यात १ हजार ९४५, मावळ १ हजार ६१२, मुळशी १ हजार ४९५, शिरुर २ हजार १९०, हवेली १ हजार ८००, दौंड २ हजार ६० , इंदापूर २ हजार ६३२ , पुरंदर १ हजार ५३८, भोर १ हजार १९०, वेल्हे ४५०, आंबेगाव १ हजार ५७५, जुन्नर २ हजार ४११ आणि खेड २ हजार २१६ तालुक्यात असे एकूण २३ हजार ११४ मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे.

बारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात असे एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र आहेत.

निवडणुकीच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीवर कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून नागरिकांनी ०२०-२६१२३३७१ हेल्पलाईन क्रमांक तसेच १०७७ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

## पुणे महानगरपालिका, पुणे
### निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : ०३/०२/२०२६ १४:३० दुपारी ते १२/०२/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
स्वीकृती दिनांक : ०३/०२/२०२६ १४:३० दुपारी ते १२/०२/२०२६ १४:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १३/०२/२०२६ १५:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_ SUPPLY/ 2025/549 | पाणी पुरवठा | साधू वासवानी पुलाच्या कामामध्ये अडथळा ठरणारी १००० मीमी व्यासाची MS पाईप टाकणे. | रु. ६०७९/- | रु. ८४६४३३६/- | रु. ८४६४३/- | ६ | संदीप दिपके ८६६९६२८६७० |
| PMC/WATER_ SUPPLY/ 2025/598 | पाणी पुरवठा | फुरसुंगी देवाची उरूळी येथे ३३ एम एल डी प्रकल्पातील अस्तित्वातील मोठ्या व्यासाच्या नलिकांची देखभाल दुरूस्ती करणे. | रु. ६०७९/- | रू. ५८२०३७२/- | रू. ५८२०४/- | १२ | निखील मारूती घरत ९५४५४२०५१९ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS /RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Atharva Nitin Khutwad
टेंडर लिपिक
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

सही/-
Rajesh Shinde
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

**जाहिरात क्रमांक : २/१६१२ दि. ०२/०२/२०२६**






# दीवाने इंडिया का दीवाना हमसफर मोहिमेचे अनावरण

**पुणे (दै. संध्या) :**

आयसीसी मेन्स टी20 वर्ल्ड कप 2026 ची उत्सुकता वाढत असताना ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) ने आयसीसीच्या भागीदारीने दीवाने इंडिया का दीवाना हमसफर ही ब्रँड कँपेन सुरू केली आहे. क्रिकेटप्रती असलेले प्रेम साजरे करण्यासाठी या एकात्मिक मोहिमेत ऑन ग्राऊंड अनुभव,आयकॉनिक मुमेंटस, डीलरशिप अॅक्टीव्हेशन आणि मास मिडिया आऊटरिचचा समावेश आहे.

# बजाज इन्शुरन्सकडून 'बीएसई ५०० क्वालिटी ५० इंडेक्स फंड' चे अनावरण

**पुणे (दै. संध्या) :**

भारतातील अग्रगण्य खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज लाइफ इन्शुरन्सने आपला नवीन फंड ऑफर (NFO), 'बजाज लाइफ बीएसई 500 क्वालिटी 50 इंडेक्स फंड'च्या शुभारंभाची घोषणा केली आहे. मजबूत आर्थिक स्थिती, सातत्यपूर्ण कमाई आणि योग्य ताळेबंद असलेल्या भारतीय कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी गुंतवणूकदारांना देण्यासाठी हा फंड तयार करण्यात आला आहे. बजाज लाइफच्या युनिट-लिंक्ड विमा योजना (ULIPs) – बजाज लाइफ स्मार्ट वेल्थ गोल, बजाज लाइफ सुप्रीम आणि बजाज लाइफ गेन – अंतर्गत हा फंड उपलब्ध आहे, ज्यामुळे पॉलिसीधारकांना जीवन संरक्षण आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीच्या दुहेरी फायद्याचा लाभ घेत आपल्या जीवनातील ध्येय साध्य करता येतील. बाजारातील सततची अस्थिरता आणि बदलत्या स्थूल-आर्थिक परिस्थितीमुळे, गुंतवणूकदार आता मजबूत मूलभूत तत्त्वे आणि कमाईमध्ये शिस्त असलेल्या कंपन्यांवर अधिकाधिक विश्वास टाकत आहेत. गुंतवणुकीचा एक घटक म्हणून गुणवत्ता, नफाक्षमता, मजबूत ताळेबंद आणि कमाईच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित केले जाते, ज्यामुळे ती वेगवेगळ्या मार्केट सायकल्समध्ये प्रासंगिक ठरते. बजाज लाईफ बीएसई 500 क्वालिटी 50 इंडेक्स फंड एका पारदर्शक आणि नियमांवर आधारित गुंतवणूक आराखड्याद्वारे गुंतवणूकदारांची गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. हा फंड बीएसई 500 क्वालिटी 50 इंडेक्सचे अनुसरण करतो. यात रिटर्न ऑन इक्विटी, अक्रूअल्स रेशो आणि फायनान्शियल लिव्हरेज यांसारख्या परिभाषित गुणवत्ता निकषांवर आधारित, व्यापक बीएसई ५०० समूहातून निवडलेल्या 50 कंपन्यांचा समावेश आहे. एकाच ठिकाणी सगळी गुंतवणूक होण्याचा धोका टाळत, स्टॉक-स्तरीय आणि क्षेत्र-स्तरीय मर्यादांचे पालन करत, फ्लोट-समायोजित बाजार भांडवल आणि गुणवत्ता गुणांच्या संयोजनाचा वापर करून घटक कंपन्यांना भारांश दिला जातो. फंडाची अद्ययावत माहिती देण्यासाठी आणि त्याची गुणवत्ता वैशिष्ट्ये टिकवून ठेवण्यासाठी निर्देशांकाचे तिमाही आधारावर पुनर्संतुलन केले जाते.

## जाहीर समन्स
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
### पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.,पुणे
बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट्स पहिला मजला,भिगवण रोड,मु.पो.बारामती,पुणे
ता.बारामती जि.पुणे.फोन (०२११) २२९५३२

**पुरंदर नागरी सहकारी पत संस्था मर्या सासवड – अर्जदार**
मार्केटयार्ड – सासवड ता.पुरंदर जि.पुणे ४१२३०१

**विरूध्द – जाब देणार**

| अ | प्रतिवादीचे नाव व पत्ता | प्रतिवादी क. | दावा क. | दावा रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री.विकास ज्ञानदेव मोरे** फ्लॅट नं सी.३०४ जे.एस.पी.एम.कॉलेज जवळ रतन नेपच्युन काळेपडळ पुणे ४११०२८ | २ | ८३९/२५ | ६,९१,३७०/- |
| २ | **श्री.श्रीधर लक्ष्मण कुल** मु.पो खामगांव, ता.दौंड, जि.पुणे ४१२२१४ | ३ | ८३९/२५ | ६,९१,३७०/- |
| ३ | **श्री.प्रकाश युवराज देठे** स नं ११८/३, महाराष्ट्र कॉलनी, अय्यपा मंदिर जवळ काळेवाडी, पिंपरी, पुणे शहर ४११०१७ मो.७०६६०५७०६९ | ५ | ८३९/२५ | ६,९१,३७०/- |
| ४ | **श्री.अमोल रघुनाथ चव्हाण** मु.पो हनुमान मंदिराजवळ पुणे सोलापुर रोड कवडी माळवाडी मांजरी खुर्द, ता.हवेली, जि.पुणे ४१२३०७ | १ | ८४०/२५ | १,७२,९८०/- |
| ५ | **सौ.मेराज बाबु शेख** १८८ शास्त्री नगर, सहयाद्री हॉस्पिटल, जवळ येरवडा, जि.पुणे | १ | ९६७/२५ | २,०२,८४६/- |
| ६ | **श्री.आशिष जगन्नाथ जाधव** ६३३ गंज पेठ महात्मा फुले पेठ , जि.पुणे ४११०४२ | ३ | ९६७/२५ | २,०२,८४६/- |
| ७ | **श्री.कार्तिक राजेंद्र पवार** ओम पर्ल फ्लॅट नं.८ अभिनव कॉलेज जवळ न-हे धायरी हवेली जि.पुणे | १ | ९६८/२५ | २,०१,९९०/- |
| ८ | **श्री.सुदाम कान्होबा थोपटे** २०१ गणेश पेठ बोरा ट्रान्सपोर्ट जवळ पांगुळआळी, जि.पुणे | २ | ९६८/२५ | २,०१,९९०/- |
| ९ | **श्री.संतोष सोमनाथ खांदवे** गव्हमेंट कॉटर्स नं.पी.१८८ शास्त्री नगर येरवडा, जि.पुणे | १ | ९६९/२५ | १,०८,०३१/- |
| १० | **श्री.संतोष मोतीलाल धर्मोज** डॉ नायडु सर्वट कॉटस कुटुंब कल्याण ऑफिस मागे जि.पुणे | २ | ९६९/२५ | १,०८,०३१/- |
| ११ | **श्री.राजु विजय जाधव** समाट अशोक मंडळा शेजारी ५८६/१ महात्मा फुले पेठ, जि.पुणे | ३ | ९६९/२५ | १,०८,०३१/- |
| १२ | **श्री.अमोल कचरू वखरे** स.नं.९/२/१ फ्लॅट नं.२०२ यशेदा अपार्टमेन्ट शशिकांत हाईटस समोर आंबेगाव, जि.पुणे ४११०४६ | १ | ९७०/२५ | १,४५,९६८/- |
| १३ | **श्री.अक्षय साहेबराव महाडिक** स.नं.८३/१९ फ्लॅट नं.१०३ राजयोग कॉम्प्लेस शास्त्री नगर कोथरूड विठठल मंदिराजवळ पुणे ४११०३८ | २ | ९७०/२५ | १,४५,९६८/- |
| १४ | **श्री.समीर विलास नवले** फ्लॅट न २०३ यशोदा अपार्टमेंट स.नं.९/१/२ आंबेगाव बु, जि.पुणे | ३ | ९७०/२५ | १,४५,९६८/- |
| १५ | **श्री.अनिल दत्तात्रय कोरे** डी ४८ भिमाशंकर कॉलनी गुंजन टॉकीज जवळ येरवडा | १ | ९७१/२५ | १,४२,२१८/- |
| १६ | **श्री.दिनेश अशोक शिंदे** ९/७४ महर्षी नगर दुर्गामाता मंदिरा शेजारी, जि.पुणे ४११०३७ | ३ | ९७१/२५ | १,४२,२१८/- |
| १७ | **श्री.प्रशांत प्रल्हाद थोपटे** मु.पो.पिंपरे, ता.पुरंदर जि.पुणे ४१२१०२ | १ | ९९२/२५ | १,५०,७०६/- |
| १८ | **श्री.मनोज सदाशिव गायकवाड** मु.पो.पिंपरे, ता.पुरंदर जि.पुणे ४१२१०२ | २ | ९९२/२५ | १,५०,७०६/- |
| १९ | **श्री.राजेंद्र ज्ञानेश्वर थोपटे** मु.पो.पिंपरे खुर्द, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | ३ | ९९२/२५ | १,५०,७०६/- |
| २० | **श्री.कुमार रामचंद्र भोसले** मु.पो.जेऊर, ता.पुरंदर जि.पुणे.४१२३०५ | १ | ९९४/२५ | २,५४,७४७/- |
| २१ | **श्री.सागर धनाजी जाधव** मु.पो.जेऊर, ता.पुरंदर जि.पुणे.४१२३०५ | २ | ९९४/२५ | २,५४,७४७/- |
| २२ | **श्री.प्रदिप बाबुराव जाधव** मु.पो.जेऊर, ता.पुरंदर जि.पुणे.४१२३०५ | ३ | ९९४/२५ | २,५४,७४७/- |
| २३ | **श्री.पोपट लक्ष्मण जाधव** मु.पो.जेऊर, ता.पुरंदर जि.पुणे.४१२३०५ | १ | ९९५/२५ | ९८,३३४/- |
| २४ | **श्री.विक्रम पोपट जाधव** मु.पो.जेऊर, ता.पुरंदर जि.पुणे.४१२३०५ | २ | ९९५/२५ | ९८,३३४/- |
| २५ | **श्री.विशाल यशवंत जाधव** मु.पो.जेऊर, ता.पुरंदर जि.पुणे.४१२३०५ | ३ | ९९५/२५ | ९८,३३४/- |
| २६ | **श्री.रणजित विजय आंबेकर** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | ९९६/२५ | १,१४,४९३/- |
| २७ | **श्री.दिलीप विठ्ठल गायकवाड** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | ९९६/२५ | १,१४,४९३/- |
| २८ | **श्री.जितेंद्र आनंदराव रणवरे** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | ९९७/२५ | २,४८,८१९/- |
| २९ | **श्री.दिलीप विठ्ठल गायकवाड** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | ९९७/२५ | २,४८,८१९/- |
| ३० | **श्री.घनश्याम बाबुलाल शिनगारे** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | ९९८/२५ | ९४,६९५/- |
| ३१ | **श्रीमती.निशा दत्तात्रय पवार** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | ९९८/२५ | ९४,६९५/- |
| ३२ | **सौ.निकीता जितेंद्र रणवरे** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | ९९९/२५ | १,०३,८०९/- |
| ३३ | **श्री.दिलीप विठ्ठल गायकवाड** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | ९९९/२५ | १,०३,८०९/- |
| ३४ | **सौ.रंजना तानाजी मोहिते** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | १०००/२५ | २,९५,५८८/- |
| ३५ | **श्रीमती.निशा दत्तात्रय पवार** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | १०००/२५ | २,९५,५८८/- |
| ३६ | **श्री.राजु नामदेव गोरे** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | १००१/२५ | २,०९,६११/- |
| ३७ | **श्री.दिलीप विठ्ठल गायकवाड** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | १००१/२५ | २,०९,६११/- |
| ३८ | **श्री.आकाश संजय धुमाळ** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | १००२/२५ | १,२९,६८९/- |
| ३९ | **श्रीमती.निशा दत्तात्रय पवार** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | २ | १००२/२५ | १,२९,६८९/- |
| ४० | **श्री.सनी रामचंद्र वाडेकर** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | १००३/२५ | १,९३,०४४/- |
| ४१ | **श्री.आभिजित बबनराव वाडेकर** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | २ | १००३/२५ | १,९३,०४४/- |
| ४२ | **सौ.आरती चंद्रकांत माने** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | १ | १००४/२५ | २,८०,११७/- |
| ४३ | **श्री.चंद्रकांत अशोक माने** मु.पो.निरा, ता.पुरंदर जि.पुणे.४१२१०२ | २ | १००४/२५ | २,८०,११७/- |
| ४४ | **श्री.दिलीप विठ्ठल गायकवाड** मु.पो.वार्ड क.४ निरा, ता.पुरंदर, जि.पुणे ४१२१०२ | ३ | १००४/२५ | २,८०,११७/- |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिष्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादी यांना समन्स रूजु न झाल्याने त्यांचा नविन पत्ता उपलब्ध नसल्याने हे जाहीर समन्स देत आहेत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणने मांडण्यासाठी स्वतः जातीने **दिनांक ०६/०२/२०२६** रोजी **११.३०** वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रासह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटिसीव्दारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैर हजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याच प्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रदद् समजन्यात येईल.

म्हणुन आज **दिनांक २३/०१/२०२६** रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहिर समन्स दिला आहे.

शिक्का

सही /-
(श्री.एस.एम.तांदळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे फेडरेशन लि,पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आळंदी म्हातोबा गावात राष्ट्रवादीच्या प्रचार सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : आळंदी म्हातोबा येथे आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रचार सभा पार पडली. जिल्हा परिषद उमेदवार सौ. कोमल संदेश आव्हाळे व पंचायत समिती थेऊर गणाचे उमेदवार युवराज हिरामण काकडे यांच्या प्रचारासाठी आयोजित या सभेत कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीलाच राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते, जनतेच्या हक्कासाठी आयुष्यभर लढा देणारे नेतृत्वाचे बळ–अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तर मनात कृतज्ञतेची भावना होती. दोन मिनिटांचे मौन पाळून त्यांच्या संघर्षमय राजकीय वाटचालीला सलाम करण्यात आला. “अजित पवार हे नाव केवळ नेत्याचे नाही, तर सामान्य माणसाच्या आशेचे प्रतीक आहे,” अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने गावागावात विकास पोहोचवला, असे मत वक्त्यांनी मांडले. सभेत बोलताना उमेदवारांनी विकास, शेतकरी, महिला सक्षमीकरण व युवकांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडली. “साथ विकासाला, मत घड्याळाला” हा संदेश देत कार्यकर्त्यांनी एकजुटीचा निर्धार केला. या भावनिक सभेने गावात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद पुन्हा एकदा दाखवून दिली असून, आगामी निवडणुकीत घड्याळाचा आवाज अधिक बुलंद होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.



### शहराच्या प्रगतीची घोडदौड महापौर कायम ठेवतील- आमदार शंकर जगताप

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरासाठी भाजपच्या वतीने महापौरपदासाठी रवी लांडगे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महापौर म्हणून रवी लांडगे यांच्या माध्यमातून महापालिकेच्या सभागृहातून शहरासाठी सर्वंकष विकासाचे निर्णय होतील आणि शहराच्या प्रगतीची घोडदौड कायम राखली जाईल असा विश्वास निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी सोमवारी व्यक्त केला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड शहराच्या महापौर पदासाठी रवी लांडगे आणि उपमहापौर पदासाठी शर्मिला बाबर यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यावेळी सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, भोसरीचे आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, अमित गोरखे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, ज्येष्ठ नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेविका नम्रता लोंढे, ज्येष्ठ नगरसेवक राजू मिसाळ, नगरसेवक अभिषेक बारणे, माजी उपमहापौर केशव घोळवे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीमध्ये भाजपला शहरातून घवघवीत यश मिळाले. नागरिकांनी भाजपवर एक हाती विश्वास सोपवला आहे. हा विश्वास पूर्ण करण्याची जबाबदारी आता प्रत्येक नगरसेवकाची आहे. "जबाबदार पालक" या नात्याने प्रत्येक नगरसेवक आता काम करणार आहे. भाजपचे शिस्त, संघटन आणि साधनसुचिता या सर्व गोष्टींचे पालन करण्यासाठी महापालिकेचे सभागृह हे अंतिम असेल. या सभागृहातून शहराच्या विकासाला दिशा देण्याचे काम आगामी काळात महापौर म्हणून रवी लांडगे करतील असा विश्वास असल्याचे आमदार जगताप म्हणाले.



### पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा आमदार महेश लांडगे यांचा “आदर्श”

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने बहुमत मिळवले. त्यानंतर आता महापौर-उपमहापौर कोण होणार? याबाबतची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. अखेर भाजपाच्या प्रदेश नेतृत्त्वाने महापौरपदासाठी भोसरीतील बिनविरोध नगरसेवक रवि लांडगे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचा नव्या महापौरपदाची निवड शुक्रवारी (दि.6) होणार आहे. त्या दिवशी महापालिकेची पहिली विशेष सर्वसाधारण सभा आहे. त्यावेळी महापौर आणि उपमहापौर यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब होणार आहे. तत्पूर्वी, सोमवारी (दि.2) उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी महापौर व उपमहापौर या दोन महत्त्वाच्या पदांसाठी नामनिर्देशन पत्र शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना पाठवले आहे. त्यामध्ये महापौरपदासाठी रवि लांडगे यांच्या नावाचा उल्लेख आहे. यानुसार पुढील कार्यवाही करावी, असे निर्देश प्रदेशाध्यक्षांनी दिले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौरपद खुला होताच शहराच्या राजकारणात एकच नाव ठामपणे पुढे येत आहे ते म्हणजे भाजपाचे दोनवेळा बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक रवि लांडगे. भोसरीतील प्रभाग क्रमांक ६ मधून २०१७ आणि २०२६ असे सलग दुसऱ्यांदा रवि लांडगे हे बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. त्यांचे चुलते कै. अंकुशराव लांडगे हे भाजपचे माजी शहराध्यक्ष होते. त्यांनी पिंपरी-चिंचवडवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व असताना भाजपाला उभारी दिली होती. त्या विपरीत राजकीय परिस्थितीत आणि कठीण काळात कै. अंकुशराव लांडगे यांनी भाजपचे दोन अंकी नगरसेवक निवडून आणत शहरातील राजकीय गणित बदलण्याची मुहूर्तमेढ रोवली होती.

# सर्वांगीण विकास व्हावा यासाठी पीसीईटीच्या पायाभूत सुविधा

**ज्ञानेश्वर लांडगे : झोनल कुस्ती स्पर्धेचे यजमानपद पीसीपीला, १२ तंत्रनिकेतन महाविद्यालयांचा सहभाग**



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने केजी टू पीएचडी अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक जडणघडण होत असताना त्यांचा शारीरिक व मानसिक विकास देखील उत्कृष्ट व्हावा यासाठी पीसीईटीच्या सर्व शाखांमध्ये उच्च दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे कुस्ती स्पर्धेचे यजमानपद पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन विद्यालयाला मिळणे कौतुकास्पद आहे असे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे म्हणाले.

इंटर इंजिनियरींग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्टस् असोसिएशन च्या वतीने आयोजित डी-१ झोनल कुस्ती स्पर्धेचे यजमानपद पिंपरी चिंचवड पॉलीटेक्निकने भुषविले. भोसरी येथील पै. मारुतीराव लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती केंद्र येथे आयोजित केलेल्या या स्पर्धांचे उद्घाटन पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते पहिली कुस्ती लावण्यात आली. यावेळी उद्योजक नरेंद्र लांडगे, प्राचार्य डॉ. विद्या बॅंकॉड, अनुजा कामठे, भारती भसे, गौरी जाधव, गायत्री जगताप, सदाशिव लांडगे, रुपेश पवार, सोमनाथ खेडेकर, एम. एम. शेख, कुस्ती पंच, मार्गदर्शक व विविध १२ तंत्र तंत्रनिकेतन विद्यालयातील सहभागी खेळाडू उपस्थित होते.

५७ किलो, ६१, ६५, ७०, ७४, ८६, ९७ आणि १२५ किलो वजनी गटातील मॅट वरील कुस्त्या घेण्यात आल्या. विजेत्या व उपविजेत्या स्पर्धकांना नगरसेवक ॲड. नितिन लांडगे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी नगरसेवक अमित गावडे, पवना सहकारी बँकेचे संचालक जयनाथ काटे, सामाजिक कार्यकर्ते संतोष महाराज लांडगे, निवृत्ती लांडगे, सुरेश लांडगे, राजेंद्र लांडगे, संतोष माचुत्रे, प्राचार्य डॉ. विद्या बॅंकॉड आदी उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे : ५७ किलो वजनी गटात राजर्षी शाहु तंत्रनिकेतन, ताथवडे च्या श्रेयस शिंदे याने झिल तंत्रनिकेतन च्या प्रणव वीर चा पराभव केला. ६१ किलो वजनी गटात झिल तंत्रनिकेतन चा अभिमन्यू बानगुडे याने जयहिंद तंत्रनिकेतनच्या ओम मोरे ला चितपट केले. तर ६५ किलो वजनी गटामध्ये झिल तंत्रनिकेतनच्या आदित्य भारेकर याने समर्थ तंत्रनिकेतनच्या आयुष रोकडे वर विजय मिळवला. ७० किलो वजनी गटात भिवराबाई सावंत तंत्रनिकेतनच्या खेळाडूंमध्ये लढत झाली. यामध्ये किरण कोळपे याने सागर घोरपडे वर विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. ७४ किलो वजनी गटात झिल तंत्रनिकेतनच्या विश्वजित तोरवे ने पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतनच्या दुर्वांकुर लांडगे चा पराभव केला. तसेच ८६ किलो वजनी गटात राजगड तंत्रनिकेतनच्या दोन खेळाडूंमध्ये लक्षवेधी लढत झाली या लढतीत धिरज सारक याने आयुष वीर चा पराभव केला. ९७ किलो वजनी गटात पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतनच्या विकुल सांगोले याने झिल तंत्रनिकेतनच्या समीर खुटवड चा पराभव केला.

१२५ किलो वजनी गटात भिवराबाई सांवत तंत्रनिकेतनच्या करण ठोंबरे याने कुस्त्रो वाडिया तंत्रनिकेतनच्या आनंद वाघमारे याच्यावर मात करून प्रथम क्रमांक पटकावला.

पीसीपीचे क्रिडा प्रभारी सुनील जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थरकुडे यांनी प्राचार्य डॉ. विद्या बॅंकॉड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे संयोजन केले. कुस्ती पंच म्हणून विजय कुटे, विशाल मोहिते यांनी आणि संघ व्यवस्थापक राहुल पवार, योगेश ठाकरे यांनी काम पाहिले. सर्व विजेत्या खेळाडूंचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले.

## विकसित भारत @२०४७ च्या स्वप्नपूर्तीसाठी बुलंद हुंकार..!

पिंपरी (दै. संध्या) :

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत देशाचा अर्थसंकल्प 2026-27 सादर केला, ज्याकडे ‘विकसित भारताचा रोडमॅप’ म्हणून पाहिले जात आहे. या अर्थसंकल्पात देशाला आणि राज्याला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी पायाभूत सुविधा आणि मध्यमवर्गीयांच्या कल्याणावर विशेष भर दिला आहे. आमदार अमित गोरखे यांच्या मते, या अर्थसंकल्पाचे सकारात्मक परिणाम स्थानिक स्तरावरही उमटणार आहेत. नव्या तरतुदींमुळे पिंपरी-चिंचवडच्या विकासाला आणि स्थानिक उद्योगांना मोठी चालना मिळणार असून, दळणवळण, रोजगार आणि आधुनिक सुविधांच्या बाबतीत हा अर्थसंकल्प शहरासाठी खऱ्या अर्थाने ‘गेम चेंजर’ ठरणार आहे.

पिंपरी-चिंचवड हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे औद्योगिक शहर असून येथील लघु व मध्यम उद्योगांना जागतिक स्पर्धेत टिकवण्यासाठी आर्थिक बळकटी देणे आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करणे ही शहराच्या विकासाची प्राथमिकता आहे. आजच्या अर्थसंकल्पामुळे शहराचा सर्वांगीण विकास, रेल्वेचे जाळे आणि अनुसूचित जाती प्रवर्गातील तरुणांसाठी विशेष संधी या बाबींवर लक्ष केंद्रित झाले आहे.

## उमेदवारांनी घरोघरी जाऊन प्रचार करा : रवींद्र चव्हाण

लोणी काळभोर (दै. संध्या) :

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज पुणे जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. घरोघरी जाऊन प्रचार करा, छोट्या बैठका व मेळाव्यांवर भर द्या, स्थानिक पातळीवर प्रचार करा, असे स्पष्ट निर्देश चव्हाण यांनी दिले.प्रदेश स्तरावरील कोणताही मंत्री किंवा पदाधिकारी प्रचारासाठी येणार नाही. स्थानिक कार्यकर्त्यांनीच प्रचाराची धुरा सांभाळावी, असेही त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमांतून झालेली विविध विकासकामे आणि शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा, असे आवाहन रवींद्र चव्हाण यांनी केले. भाजपची बूथ यंत्रणा सक्षम असून, त्या माध्यमातून प्रचार यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबवावी असे चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले. संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांची मेहनत आणि विकासाच्या मुद्द्यांवर आधारित प्रचार यामुळे पक्षाला मोठे यश मिळेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार राहुल कुल, भीमराव तापकीर, पुणे दक्षिण जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, पुणे उत्तर जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, माजी आमदार संजय जगताप आणि संग्राम थोपटे यांची प्रमुख उपस्थिती होती. राजेश पांडे यांनी सूत्रसंचालन केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना बैठकीत श्रद्धांजली वाहण्यात आली.




## जिज्ञासू वृत्ती बाळगली पाहिजे - डॉ. नातू

**राजर्षी शाहू कॉलेजमध्ये "इनोव्हिजन"चे उदघाटन**

पिंपरी (दै. संध्या) :



दैनंदिन जीवन जगताना प्रत्येक बाबींमध्ये विज्ञान दडलेलेले असते. मात्र आपण ती वैज्ञानिक दृष्ट्या जाणून घेतली पाहिजे. यासाठी आपण जिज्ञासू वृती बाळगली पाहिजेत. असे मत

कोलकाता येथील बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, (IISER) चे अध्यक्ष डॉ अरविंद नातू यांनी व्यक्त केले.

जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ताथवडे येथील राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "इनोव्हिजन २०२६" या भव्य टेक्नो–सोशल महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी ते बोलत होते .

या प्रसंगी माहिती तंत्रज्ञान लेखक, करिअर समुपदेशक डॉ.दीपक शिकारपूर,मॅग्ना इंटरनॅशनल चे प्रकल्प प्रमुख अभय दांडेकर, टाटा टेलिकम्युनिकेशनचे सल्लागार पियुष गोयल, श्यामसुंदर मडेवार, जेएसपीएमचे संचालक अनिल भोसले, कार्यकारी संचालक डॉ पी.पी विटकर, ताथवडे शैक्षणिक संकुल संचालक डॉ सुधीर भिलारे, शेतकरी शैक्षणिक संस्थेचे संचालक रवी सावंत, शाहू कॉलेजचे संचालक डॉ अविनाश बडधे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ बडधे म्हणाले कि,इनोव्हिजन हा उपक्रम नवकल्पना, सहकार्य आणि ज्ञानविनिमयाचे प्रभावी केंद्र म्हणून ओळखला जात असून, इनोव्हिजन २०२६ ही आवृत्ती अधिक व्यापक, समावेशक आणि भव्य स्वरूपाची ठरणार आहे. इनोव्हिजन २०२६ची यावर्षीची संकल्पना “समावेशक व शाश्वत विकासासाठी तंत्रज्ञान” अशी असून, नैतिक मूल्ये, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी यांचा समन्वय अधोरेखित करते.

डॉ शिकारपूर म्हणाले कि,२०२६ सालामध्ये भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे आणि 'एआय' आता केवळ जुजबी वापर आणि प्रायोगिक पुरते राहिले नाही. भारतीय तंत्रज्ञांसाठी या वर्षीची सर्वात महत्त्वाची तंत्रज्ञाने आणि त्यासाठी करिअर नोकरीसाठीची तयारी हा विद्यार्थी व शिक्षकांपुढचा मुख्य प्रश्न असला पाहिजे . जागतिकीकरणामुळे केवळ तंत्रज्ञान माहीत असणे पुरेसे नाही, तर संवाद साधणेही महत्त्वाचे झाले आहे.

भारतीय कंपन्या आता युरोप, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या देशांमध्ये आपला व्यवसाय वाढवत आहेत. अशा वेळी जपानी, जर्मन, फ्रेंच किंवा मँडरीन (चिनी) भाषा येणाऱ्या तंत्रज्ञांना इतरांच्या तुलनेत ३० ते ४० टक्के जास्त पगार आणि परदेशात कामाची संधी मिळत आहे. एआय भाषांतर करत असले तरी, मानवी संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि व्यावसायिक करारांसाठी भाषेचे ज्ञान असणे हे एक मोठे कौशल्य मानले जात आहे. तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य आणि वेळेचे नियोजन यांसारख्या सॉफ्ट स्किल्सना देखील खूप महत्त्व आहे कारण बहुतांश कंपन्या आता हायब्रीड मॉडेलवर काम करत आहेत.

## पिंपरीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवादन



पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी प्रभाग क्रमांक 21 मधील ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या सभागृहामध्ये ग्रामस्थांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे दुःखद निधन झाल्याने शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरसेवक संदिप वाघेरे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. शहरातील पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, शिक्षण, आरोग्य तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे वाघेरे यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड शहराच्या प्रगतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. त्यांच्या जाण्याने राज्याने एक दूरदृष्टी असलेले नेतृत्व गमावले असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास नगरसेवक हिरानंद आसवानी, निकिता कदम, प्रियांका कुदळे, गिरिजादेवी कुदळे, दीपिका कापसे, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष वसंत तावरे, सुधाकर यादव, स्वामी सर, कैलास भुजबळ, तसेच सामाजिक कार्यकर्ते शेखर अहिरराव, राजेंद्र वाघेरे, किशोर येळवंडे, राकेश मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# जर्मन शिष्टमंडळाने दिली पीसीईटी व पीसीयू येथे भेट

**पिंपरी चिंचवड विद्यापीठात भारत – जर्मनी शैक्षणिक व संशोधनाला नवी दिशा - जर्मनी, कार्लस्रुहे शहराचे महापौर डॉ. फ्रँक मेंट्रुप**

पिंपरी (दै. संध्या) :

विद्युत वाहने, नवीकरणीय ऊर्जा, ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मोबिलिटी, क्वांटम तंत्रज्ञान व अनुप्रयुक्त संशोधन या क्षेत्रांमध्ये भारत जर्मनी सहकार्य झाले, तर ऊर्जा संक्रमण व प्रगत मोबिलिटी सोल्यूशन्समध्ये जर्मनीकडे असलेले जागतिक कौशल्य भारतीय संशोधकांना संयुक्त संशोधनासाठी उपयोगी ठरेल. यातून व्यापक सहकार्याच्या अनेक संधी उपलब्ध होतील असा विश्वास जर्मनीतील कार्लस्रुहे शहराचे महापौर डॉ. फ्रँक मेंट्रुप यांनी व्यक्त केला. तसेच १९९० पासून पीसीईटीने उच्च शिक्षण आणि संशोधन, रोजगार यासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) कार्यालय आणि साते वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू), पुणे येथे जर्मनीतील कार्लस्रुहे शहराचे महापौर डॉ. फ्रँक मेंट्रुप यांच्यासह उच्चस्तरीय जर्मन शिष्टमंडळाने नुकतीच भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश शैक्षणिक सहकार्य, संयुक्त संशोधन, प्राध्यापक देवाणघेवाण, नवोन्मेष तसेच उद्योग, उच्च शिक्षण भागीदारी या विषयांवर सखोल चर्चा करणे हा होता.

पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी जर्मन शिष्टमंडळाचे स्वागत केले व पीसीईटी आणि पीसीयू च्या वाढत्या आलेखाची माहिती दिली.



यावेळी कार्लस्रुहे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (केआयटी) या जर्मनीतील अग्रगण्य अभियांत्रिकी व नैसर्गिक विज्ञान केंद्र व संशोधन विद्यापीठाचे प्रतिनिधी, सिंगापूर गोविन होल्डिंग्सचे ग्रुप सीईओ डॉ. आनंद गोविंदालुरी, पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर, आंतरराष्ट्रीय सल्लागार डॉ. दिनेश अमळनेरकर, सेंटर फॉर युरोपियन स्टडीजच्या प्रमुख डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन, संचालक, संशोधन व विकास डॉ. भरत काळे, आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. शंकर देओस्कर, पीसीईटी आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. रोशनी राऊत, पीसीयू स्कूल ऑफ इंजिनिअरिंग डीन डॉ. विजय पाटील, पीसीसीओईआर संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, एसबीपीआयएम संचालक डॉ. किर्ती धारवडकर, एनएमआयइटी संचालक डॉ. प्रमोद पाटील, पीबीएस संचालक डॉ. गणेश राव, एसबीपीसीओएडी प्रभारी प्राचार्य शिल्पा पाटील, एस. बी. पाटील कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स प्राचार्य प्रा. संदीप पाटील, एस. बी. पाटील पब्लिक स्कूल प्राचार्य डॉ. बिंदू सैनी, आयआरसी समन्वयक उपस्थित होते.

यावेळी गोविंदालुरी यांनी सांगितले की इंडो–जर्मन स्किलिंग उपक्रमांतर्गत दरवर्षी ४,००० हून अधिक कुशल मनुष्यबळ तयार केले जाते, जे महाराष्ट्र शासन व जर्मनी यांच्यातील सामंजस्य करारांमुळे शक्य झाले आहे. तसेच पुणे शहराचेही जर्मनीसोबत करार आहेत आणि भविष्यात महाराष्ट्र व जर्मनी शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास व तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी अधिक जवळून काम करतील, असा विश्वास व्यक्त केला.

सूत्रसंचालन डॉ. ऐश्वर्या गोपालकृष्णन यांनी केले. पीसीईटी अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ गिरीश देसाई यांनी देखील जर्मनीच्या शिष्टमंडळाला शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नायगाव येथे माघ पौर्णिमा उत्साहात साजरी

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील श्री क्षेत्र नायगाव येथे माघ पौर्णिमा निमित्त भाविकांनी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. माघ पौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले. त्रिंबक बळी चौंडकर (नायगाव) यांच्या सौजन्याने ह.भ.प. स्वप्निल महाराज काळाणे(सासवड) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला.त्यांनी अनेक उदाहरणे देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले.त्यांना गायन साथ आबा महाराज बोरकर,धनंजय महाराज मोरे व मृदुंग साथ तेजस खेसे,अमर खेसे यांनी दिली.भजन साथ नायगाव भजनी मंडळाने दिली. श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापुजा पुजारी माऊली जगताप यांनी केली.अन्नदान समस्त शेंडगे ग्रामस्थ,संतोष गायकवाड (नायगाव),बबन रणसिंग,नामदेव रणसिंग(रणसिंगवाडी),दत्तात्रय बोत्रे(यवत),रामचंद्र देवकर (मावडी)यांच्या वतीने करण्यात आले.मंदिर परिसराची स्वच्छता,लाईट,पाणी,दर्शनबारी आदिंची उत्तम व्यवस्था सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ नायगाव यांच्या वतीने केल्याचे राहुल कड यांनी सांगितले.तसेच रात्री देव शिकारीहून आले असल्याने मंदिरातील महाप्रसाद व प्रसाद लावणे नेहमी प्रमाणे सुरू होतील.

### भामा आसखेड धरणातून रब्बी हंगामातील दुसरे आवर्तन

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणातून यावर्षीच्या रब्बी हंगामातील दुसरे आवर्तन सोडण्यात आले आहे. धरणाच्या आयसीपीओ मधून ११०० क्युसेस वेगाने हे पाणी सोडण्यात आले. पाणी सोडण्यात आल्याने नदीकाठच्या गावांमधील आणि या पाण्यावर पाणी योजना अवलंब राहणाऱ्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. कोरेगाव भीमापर्यंत असणारे बंधारे या आवर्तनातून भरले जाणार असल्याचे धरण प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. भामा आसखेड हे धरण तालुक्याच्या पश्चिम भागात भामा नदीवर उभारले असून धरणाची पाणी साठवन क्षमता ८.१४ टीएमसी आहे. सध्या धरणात ८७.५० टक्के पाणीसाठा आहे. मागील वर्षी या धरणात ७०.३७ टक्के पाणीसाठा होता. यावर्षी पुरेसा पाऊस झाल्याने धरण शंभर टक्के भरले होते. बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सावधानता बाळगावी असे आवाहन सहाय्यक अभियंता अश्विन पवार, शाखा अभियंता शुभम सुंसुंद्रे, संदीप भोसले व कालवा निरीक्षक वसंत ढोकरे यांनी केले आहे.

### 537 कोटींचा शंभूनगरी विकास आराखडा ही अजितदादांची दूरदृष्टी

केंदुर (दैनिक संध्या) : वढु बुद्रुक आणि परिसरात स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक विकास आराखडा राबविण्यासाठी तब्बल ५३७ कोटींची तरतूद करुन आराखडा तात्काळ वास्तवात आणणे ही खरी उपमुख्यमंत्री अजितदादांची दूरदृष्टी व विकासदृष्टी आहे.दादांमुळे या कामाला किती वेगाने गती मिळू शकली याचा मी साक्षीदार आहे. त्यामुळे पाबळ-केंदूर गट हा राज्यात आदर्श करण्याचे माझे स्वप्नही दादांच्याच भरोशावर पाहिले होते,मात्र त्यांच्या पश्चात आता हे स्वप्न सत्यात आणण्याचे आव्हान माझ्या पुढे असून दादांच्या प्रेरणेने मी ते स्विकारल्याची भावना पाबळ-केंदूर जिल्हा परिषद गटाचे राष्ट्रवादीचे उमेदवार प्रफुल्ल शिवले यांनी केंदूर (ता. शिरूर) येथे व्यक्त केली. स्व.अजितदादा पवार यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी केंदूर येथील ग्रामपंचायतपुढे सर्वपक्षीय भव्य सांत्वन सभा नुकतीच पार पडली. केंदूरच्या सरपंच अलका बापूसाहेब पऱ्हाड यांच्या अध्यक्षतेखाली शोक सभेचे आयोजन केले होते, या वेळी प्रफुल्ल शिवले यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सन २००३ मध्ये थिटेवाडी प्रकल्प उभारणी, सन २०१५ मध्ये केंदूर येथील संतश्रेष्ठ कान्हुराज महाराज तिर्थस्थळ दर्जा मंजुरी, केंदूर-पाबळ ही संयुक्त ६० कोटींची सोलर पाणी योजना मंजुरी, कोरेगाव भिमा-वढु बुद्रुक-वाजेवाडी-चौफुला-केंदूर-पाबळ रस्त्यासाठी मोठ्या निधीची मंजुरी हे सर्व पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा यांचेच योगदान असल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाला सर्वपक्षीय सर्वस्तरांतील पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन रामभाऊ साकोरे यांनी केले. वाबळेवाडी शाळेच्या धर्तीवर राज्यात ५ हजार शाळा उभारणीसाठी अजितदादांनी सन २०१९ च्या अर्थसंकल्पात १५०० कोटींची तरतूद केली होती. तेच स्वप्न मी आता पाबळ-केंदूर गटातील १४ गावांतील ४४ जिल्हा परिषद शाळांच्या निमित्ताने पुर्ण करण्यासाठी जिल्हा परिषद निवडणूकीत उतरल्याचे प्रफुल्ल शिवले यांनी पत्रकारांना आवर्जून सांगितले.

### चाकण कृषी बाजारात भाजीपाल्याची मोठी आवक; लसणाचे दर कोसळले

चाकण : (दैनिक संध्या) : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डमध्ये कांदा, वांगी, फ्लॉवर, वाटाणा, हिरवी मिरची, टोमॅटो यांची भरपूर आवक झाली. लसणाचे भाव गडगडले, तर पालेभाज्यांच्या बाजारात पालक व मेथीची आवक वाढूनही भाव तेजीत राहिले. एकूण उलाढाल 6 कोटी 65 लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण 4 हजार 500 क्विंटल आवक झाली. मागील आठवड्याच्या तुलनेत ही आवक 2 हजार क्विंटलने घटली. कांद्याचा कमाल भाव 1 हजार 800 रुपयांवरून 1 हजार 600 रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक 3 हजार क्विंटल झाली. लसणाची एकूण आवक 40 क्विंटल झाली. गेल्या शनिवारच्या तुलनेत ही आवक घटली. हिरव्या मिरचीची एकूण आवक 320 क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला 6 हजार 500 रुपयांपासून ते 7,500 रुपयांपर्यंत भाव मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव: कांदा - एकूण आवक 4500 क्विंटल. भाव क्र. 1 - 1600 रुपये, भाव क्र. 2 - 1,200 रुपये, भाव क्र. 3 - 800. बटाटा - एकूण आवक - 3,000 क्विंटल. भाव क्र. 1 - 1400, भाव क्र. 2 - 1,000. फळभाज्या: फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतिदहा किलोसाठी मिळालेला दर: टोमॅटो - 348 क्विंटल (800 ते 1,500 रुपये), कोबी - 235 क्विंटल (800 ते 1,200), फ्लॉवर - 222 क्विंटल (1,000 ते 1,500), वांगी - 92 क्विंटल (2 ते 3 हजार), भेंडी - 102 क्विंटल (2,500 ते 3,500), दोडका - 69 क्विंटल (4 ते 5 हजार रुपये), कारली - 72 क्विंटल.

## वाफगाव-रेटवडी गटात अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली

राजगुरुनगर (दै. संध्या)

■ शोकसभांना उस्फूर्त प्रतिसाद

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या वाफगाव - रेटवडी जिल्हा परिषद गटात रविवारी (दि १) आयोजित करण्यात आलेल्या शोक सभांना मोठी गर्दी झाली. गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार अश्विनीताई राजेंद्र पाचारणे समर्थकांनी या शोकसभांचे आयोजन केले होते. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या सभांमध्ये गावोगावच्या कार्यकर्त्यांनी, मतदारांनी सहभाग घेऊन आपल्या लाडक्या नेत्याला साश्रूनयनानी श्रद्धांजली वाहिली. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या ऐन निवडणुकीत अजित पवारांच्या जाण्यामुळे या गटातील उमेदवारांनी गाजावाजा होणारा प्रचार थांबवला आहे. मात्र गटातील गावोगावच्या मतदारांच्या आग्रहाखातर शोकसभांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी पक्षाच्या उमेदवारांना निवडून देणे हीच अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे सांगितले. जिल्हा परिषदेच्या उमेदवार अश्विनीताई पाचारणे यांनी अजित पवारांच्या आठवणीं सांगत दादांच्या विचारांना साथ देण्याचे भावनिक आवाहन केले. पंचायत समितीचे उमेदवार अजय चव्हाण वाफगाव गणात तर प्रा. बापू चौधरी हे रेटवडी गणातील शोक सभांना उपस्थित होते. पंचायत समितीचे माजी सदस्य द्वारकानाथ टिजगे, रेटवडीगावात झालेल्या शोक सभेसाठी गावच्या सरपंच निलमताई हिंगे, राष्ट्रवादीचे युवक उपाध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य किरण पवार, सदस्य मारुती पवळे, सोसायटी अध्यक्ष रामकृष्ण वाबळे, निवृत्त कृषी अधिकारी पंडितराव वाबळे ,माजी उपसरपंच शिवाजी पवळे,माजी तंटामुक्ती अध्यक्ष मंगेश वाबळे, वसंतराव रेटवडे, सुनील वाबळे, संपत वाबळे ,ज्ञानेश्वर पवार, साहेबराव टिजगे, प्रवीण बोऱ्हाडे, दिपक काळे ,अविनाश पवळे, गोवर्धन पवळे, सुभाष पवार ,अमोल वाबळे ,मंगेश पवार, नयन खंडागळे, व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाकणमधील सम विषम पार्किंगचा नियम रद्द करण्याची शिवसेनेची मागणी



"टोइंग व्हॅनद्वारे दुचाकी उचलल्यामुळे संतप्त झालेल्या एका तरुणाने चक्क या वाहनाच्या पुढील टायर समोर लोटांगण घातले होते. तरीही वाहतूक पोलिसांना त्याची कसलीच दयामाया आली नाही, हे मात्र धक्कादायक आहे. चार चाकी वाहनांवर कारवाई का केली जात नाही. दुचाकी स्वारांसाठी शहरात तातडीने वाहनतळ उभारण्याची गरज आहे."

**- पांडुरंग गोरे, ज्येष्ठ कार्यकर्ते, शिवसेना, चाकण.**

"दुचाकी चालक व वाहतूक पोलिसांमध्ये किरकोळ कारणावरून नेहमीच वाद होतात. गेल्या काही महिन्यापासून दंड वसूल करणारे वाहतूक पोलीस टोइंग वाहनाद्वारे दुचाकी उचलून दंडात्मक कारवाई करतात. याचा मनस्ताप दुचाकी चालकांना सहन करायला लागत असल्यामुळे चाकण मधील सम विषम पार्किंगचा नियमच रद्द करण्याची गरज आहे."

**- शेखर पिंगळे, विभाग प्रमुख शिवसेना, चाकण.**

चाकण (दै. संध्या)

वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने टोइंग व्हॅनच्या माध्यमातून दुचाकी उचलून नेण्याच्या व त्यावर दंड वसूल केल्याच्या घटना अखंडपणे सुरू आहेत. त्यामुळे चाकणकर नागरिकांनी या वाहनाची प्रचंड धास्ती घेतली आहे.

रस्त्यालगत बेशिस्तपणे उभ्या असलेल्या चार चाकी वाहनावर कारवाई का होत नाही, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. येथील पोलीस दुचाकी वरील कारवाई जाणून बुजून आणि खोडसाळपणे करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलामुळे चाकणला महामार्गावर प्रचंड मोठी वाहतूक कोंडी होत असताना चाकण शहरातील वाहतूक पोलीस मात्र वाहतूक कोंडी सोडवण्यात अपयशी ठरत आहेत. यामुळे चाकणकर नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

चाकण शहरातील सम विषम पार्किंग मध्ये दुचाकी लावली असता ती दुचाकी टोइंग वाहनाद्वारे उचलून कारवाई केली जात असल्याने नागरिकांना या व्हॅनची मोठी धास्ती लागली आहे.

वास्तविक पाहता चाकण शहरात लागू केलेला सम विषम पार्किंगचा नियमच चुकीचा असल्याचा आरोप चाकण येथील शिवसेनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते पांडुरंग गोरे व शिवसेनेचे विभाग प्रमुख शेखर पिंगळे यांनी केला आहे. चाकण शहरात कोणत्याही ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना गावात प्रवेश करताना मुख्य बाजारपेठ, माणिक चौक व मार्केटयार्ड पर्यंत मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. याचे भान मात्र प्रशासनाला नाही.

चाकण शहरात लागू केलेला सम विषम पार्किंगचा नियमच रद्द करण्यात यावा, जेणेकरून नागरिकांची यातून सुटका होईल, अशी मागणी पांडुरंग गोरे व शेखर पिंगळे यांनी चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांच्याकडे केली आहे.

## निवडणूकीच्या अनुषंगाने लोणी काळभोर पोलिसांचे रूट मार्च

लोणी काळभोर (दै. संध्या)



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६च्या अनुषंगाने लोणी काळभोर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी रूट मार्च केले .

हा रूट मार्च - लोणी काळभोर पोलीस स्टेशन - लोणी काळभोर आठवडे बाजार मैदान -लोणी फाटा - लोणी स्टेशन चौक - समता नगर- इंदिरानगर - पालखी तळ मैदान - पाषाणकर बाग- विठ्ठल मंदिर - आलमगीर मज्जित - सावता माळी मंदिर चौक बिग बाजार चौक खोकलाई देवी माता चौक- श्री दत्त मंदिर चौक- पोलीस स्टेशन या ठिकाणी समाप्त करण्यात आला आहे. हा रूट मार्च जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन हद्दीतील लोणी काळभोर व कदम वस्ती गावात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी घेण्यात आलेला होता. सदरचा रूट मार्ग शांततेत पार पडला असून रूट मार्च करिता सहाय्यक पोलीस आयुक्त लोणी काळभोर विभाग पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ०९ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ५६ अंमलदार, पीटर मोबाईल, वन मोबाईल, सी आर मोबाईल लोणी स्टेशन मार्शल हजर होते. अशी माहिती राजेंद्र पन्हाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोणी काळभोर पोलीस ठाणे पुणे शहर यांनी दिली.

## गुलटेकडी फुलबाजारात दर निम्म्यावर

गुलटेकडी (दै. संध्या)

■ सुट्या फुलांचे भाव घसरले; शोभिवंत फुलांचे दर मात्र कायम

गुलटेकडी मार्केट यार्डातील फुलबाजारात सध्या सर्व प्रकारच्या फुलांची आवक नियमित आहे. प्रजासत्ताक दिन आणि रथसप्तमीच्या पार्श्वभूमीवर मागील आठवड्यात सुट्या फुलांना वाढलेली मागणी रविवारी (दि. 1) घटून पूर्वपदावर आली. त्यामुळे या फुलांचे वाढलेले दरही आता निम्म्यावर आले आहेत. मात्र, शोभिवंत फुलांचे दर टिकून असल्याची माहिती फुलव्यापारी सागर भोसले यांनी दिली.

फुलांचे प्रतिकिलोचे दर पुढीलप्रमाणे : झेंडू : 10-30, गुलछडी : 40-60, अॅष्टर : जुडी 6-10, सुट्टा 50-70, कापरी : 20-50, शेवंती : 40-70, गुलाबगड्डी



(गड्डीचे भाव) : 15-25, गुलछडी काडी : 20-50, डच गुलाब (20 नग) : 150-300, जर्बेरा : 30-50, कार्नेशियन : 150-180, शेवंती काडी 200-350, लिलियम (10 काड्या) 800-1000, ऑर्चिड 500-600, ग्लॅडिओ (10 काड्या) : 80-10, जिप्सोफिला : 300-500, लीली बंडल : 8-10.

## आवक घटल्याने शेंगदाण्याचे दर विक्रमी पातळीवर

बारामती (दै. संध्या)

■ पुणे भुसार बाजारात तुटवड्याचा फटका; शेंगदाणा तेलाच्या दरातही मोठी वाढ

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भुसार बाजारात आवक कमी असल्यामुळे सर्व प्रकारच्या शेंगदाण्याच्या दरात प्रचंड वाढ झाली असून, दराने विक्रमी पातळी गाठली आहे. यामुळे शेंगदाणा तेलाच्या दरातही डब्यामागे दोनशे रुपयांनी वाढ झाली. येथील घाऊक बाजारात गेल्या आठवड्यात साखरेच्या दरात क्विंटलमागे आणखी पन्नास रुपयांनी वाढ झाली. गुजरातमध्ये भुईमूग शेंगाचे पीक कमी आल्याने शेंगदाण्याचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. यामुळे दर मोठया प्रमाणात वाढत आहेत. गेल्या आठवडयातही येथील घाऊक बाजारात तीव्र तुटवडयामुळे सर्वच शेंगदाण्याच्या दरात क्विंटलमागे एक ते दोन हजार रुपयांपर्यंत वाढ झाली.

भारी प्रतीच्या जाडा शेंगदाण्याचा घाऊक बाजारातील दर आता प्रतीक्विंटल पंधरा हजार रुपयांवर पोहोचला असून हा दर ऐतिहासिक मानण्यात येत आहे. हलक्या प्रतीच्या टीजे शेंगदाण्याच्या दरातही मोठी वाढ झाली असून प्रतिक्विंटलचा दर 11 हजार 500 रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. हंगाम काळातच दराने उच्चांकी पातळी गाठली आहे. ही दरवाढ रोखण्याकरिता वेळीच पावले उचलली नाहीत तर दर आणखी कडाडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## स्व. आ. सुरेशभाऊ गोरे शिक्षणरत्न पुरस्काराने वारे गुरुजींचा सन्मान

चाकण (दै. संध्या)



स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या पाचव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त जगातील टॉप टेन शाळांपैकी प्रथम क्रमांक आलेल्या खेड तालुक्यातील कनेरसर येथील जालंधरनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी यांना स्व.आ. सुरेशभाऊ गोरे शिक्षणरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

एक शिक्षक कमी कालावधीत काय करू शकतो, हे वारे गुरुजी यांनी समाजाला दाखवून दिले आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून ग्रामीण भागातील शाळांची गुणवत्ता वाढवून घसरत चाललेली पट संख्या वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवून मुलांना कौशल्य विकास शिक्षण माध्यमातून विज्ञान, गणित आणि सर्व विषय हसत खेळत शिकता येतात. त्या माध्यमातून मुलांचा सर्वांगीण विकास होतो, हे वारे गुरुजी यांनी सिद्ध करून दाखविले आहे.

वारे यांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांच्या हातून विद्यार्थ्यांचा आणि समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषाताई गोरे व स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या हस्ते वारे गुरुजी यांना स्व.आ. सुरेशभाऊ गोरे शिक्षणरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाल, श्रीफळ, मानचिन्ह, गौरवपत्र व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी उद्योजक मनोहर बापू शेवकरी, उपसरपंच चांगदेव नाना झोडगे, युवराज खरपुडे, प्राचार्या प्रमिला गोरे, आदर्श शिक्षक नारायण करपे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नारायण करपे यांनी प्रास्ताविक केले. मनोहर शेवकरी यांनी सूत्रसंचालन तर, प्राचार्या प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

## आंध्रप्रदेशच्या धर्तीवर 'मन्नेरवारलू' वगळून 'कोलावार' दुरुस्ती करा !

### ट्रायबल फोरम : राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

### राज्यशासनाने ८ वर्षापासून अहवाल दडपल्याचा आरोप

राज्यातील आदिवासींचे नुकसान टाळण्यासाठी राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत आंध्रप्रदेशाच्या धर्तीवर दुरुस्ती करुन सुधारणा करण्याची मागणी ट्रायबल फोरम संघटनेने केली आहे.आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणेचे तत्कालीन आयुक्त नरेंद्र पोयाम यांनी ऑगस्ट २०१७ मध्ये सविस्तर अहवाल आदिवासी विकास विभागाच्या सचिवांना पाठविला आहे.राज्य शासनाने आठ वर्षापासून हा अहवाल दडपून ठेवला आहे."

**- बाळकृष्ण मते राज्य उपाध्यक्ष, ट्रायबल फोरम**

भिवंडी (दै. संध्या)

आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातही 'मन्नेरवारलू' वगळून 'कोलावार' अशी दुरुस्ती करण्याची मागणी राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांचेकडे ट्रायबल फोरमचे राज्य उपाध्यक्ष बाळकृष्ण मते यांनी केली आहे. मराठवाडा हा प्रदेश स्वातंत्र्यपूर्व काळात निजामाच्या हैदराबाद संस्थानचा भाग होता. निजामशाहीतून हैदराबाद मुक्तीसंग्रामाच्या लढ्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद राज्य भारतात विलीन झाले.संविधान (अनुसूचित जमाती) आदेश १९५० अन्वये तत्कालीन हैदराबाद राज्यासाठी ( औरंगाबाद विभागातील जिल्ह्यासह) प्रसिद्ध केलेल्या अनुसूचित जमाती यादीत अ.क्र. ६ वर कोलाम, मन्नेरवारलू अशी नोंद आहे. तर मध्यप्रदेश राज्यासाठी (विदर्भातील जिल्ह्यासह)प्रसिद्ध केलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये अ.क्र.१९ वर कोलाम अशी नोंद होती. त्यानंतर राज्य पुनर्रचना कायदा,१९५६ लागू झाला. त्या अंतर्गत आंध्रप्रदेश राज्यातील औरंगाबाद विभागातील त्यावेळेस अस्तित्वात असलेले एकत्रित जिल्हे छत्रपती संभाजीनगर, परभणी,नांदेड, उस्मानाबाद , बीड या जिल्हयांचा समावेश होता. दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजी हैदराबाद राज्यातील औरंगाबाद महसूल विभागातील पाचही जिल्ह्यातील क्षेत्राचा तत्कालीन मुंबई राज्यात समावेश झाला.त्यामुळे कोलाम,

मन्नेरवारलू ही नोंद जशाची तशी महाराष्ट्राच्या अनुसूचित जमातीच्या यादीत कायम राहीली.

'मन्नेरवारलू' या जमातीचा उगमच मुळात आंध्रप्रदेश मधून झाला आहे.त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (सुधारणा) कायदा २००२ प्रमाणे आंध्रप्रदेश राज्यातून 'मन्नेरवारलू' जमात वगळली असून 'मन्नेरवारलू' ऐवजी 'कोलावार' अशी दुरुस्ती करुन सुधारणा केलेली आहे.या दुरुस्तीला २४ वर्षे झाली आहे.

आंध्रप्रदेश राज्यात 'मन्नेरवारलू' जमातीच्या नामसद्रुश्याचा फायदा मोठ्या प्रमाणात घेत असल्यामुळे तेथील राज्यशासनाच्या शिफारशी वरुन केंद्र शासनाने 'मन्नेरवारलू' ही जमात वगळली असून त्याऐवजी 'कोलावार' अशी दुरुस्ती करुन सुधारणा केलेली आहे.महाराष्ट्र राज्यातही मोठ्या प्रमाणात 'मन्नेरवारलू' जमातीच्या नामसद्रुश्याचा फायदा घेतला जात आहे.परंतू महाराष्ट्रात मात्र 'मन्नेरवारलू' वगळून सुधारणा केलेली नाही.

राज्यात नोव्हेंबर २०२३ पर्यंत ११ हजार ४५ 'मन्नेरवारलू' जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र निर्गमित झाल्यामुळे शासकीय सेवेतील वर्ग १ ते वर्ग ४ च्या अनुसूचित जमातीच्या राखीव जागा मोठ्या प्रमाणात बळकावल्या आहेत. याशिवाय दरवर्षी अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या राखीव जागा मोठ्या प्रमाणात बळकावल्या जात आहे.त्यामुळे नोकरी व शैक्षणिक क्षेत्रातील भरुन न निघणारे नुकसान होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### फादर शॉच आंतरशालेय हॉकी स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन

■ मेजर ध्यानचंद स्टेडियम येथे १० फेब्रुवारीपासून रंगणार स्पर्धा

पुणे (दैनिक संध्या) : पिंपरी, नेहरूनगर येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या प्रतिष्ठित फादर शॉच आंतरशालेय हॉकी स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व शाळांमधून प्रवेशिका (एन्ट्री) मागविण्यात आल्या आहेत. लोयोला हायस्कूल आणि ईएलएएनने (एक्स-लोयोला अॅल्युमनी नेटवर्क) आयोजित ही स्पर्धा केवळ शालेय मुलांसाठी असून आणि सलग सातव्या वर्षी आयोजित केली जात आहे. ही स्पर्धा मुले आणि मुलींसाठी एकूण ५ गटांमध्ये खेळवली जाईल. स्पर्धेच्या यंदाच्या आवृत्तीत १२ वर्षांखालील मुले; १४ वर्षांखालील मुले आणि मुली तसेच १७ वर्षांखालील मुले आणि मुली असे गट समाविष्ट आहेत. ही स्पर्धा एकूण पाच वयोगटात लीग कम नॉकआउट पद्धतीने आयोजित केली जाईल, असे ईएलएएनचे अध्यक्ष नितीन जोशी यांनी स्पर्धेचा तपशील जाहीर करताना सांगितले. १२ वर्षांखालील मुले (१.१.२०१४ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले); १४ वर्षांखालील मुले आणि मुली (१.१.२०१२ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले) तसेच १७ वर्षांखालील मुले आणि मुली (१.१.२००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले) असे वयोगट आहेत. या 'केवळ शाळांसाठीच्या अनोख्या स्पर्धेत' सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या शाळांनी ६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपला प्रवेश (एन्ट्री) निश्चित करण्यासाठी विवेक काळे ( मोबाईल: ९६७३९९२९४४) किंवा रोहन जावळे (९८६५७३२०१९९) किंवा श्रीधर कुलकर्णी (८५५४००७१९१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळवले आहे.

### गिरीश महाजनांनी शिंदेसेनेला लोटलं दूर, नेते शिंदेंकडे करणार तक्रार

नाशिक (दैनिक संध्या) : "नाशिकमध्ये आम्ही परस्परांविरोधात लढलो, त्यामुळे इथे मित्रपक्षांना सोबत घेण्याची गरज नाही. नाशिकमध्ये भाजपाला कुबड्यांची गरज नाही", असे विधान करत भाजपाचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी शिंदेसेनेला नाशिकमध्ये झटका दिला. गिरीश महाजन यांच्या विधानानंतर शिंदेसेनेच्या नेत्यांनी संताप व्यक्त केला असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे तक्रार करणार आहेत. कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांची नाशिकमध्ये पत्रकार परिषद झाली. त्यावेळी शिंदेसेनेला नाशिक महापालिकेत सत्तेत सोबत घेणार का असा प्रश्न विचारण्यात आला होता. गिरीश महाजन म्हणाले, "नाशिकमध्ये आम्ही परस्पराविरोधात लढलो, त्यामुळे येथे मित्रपक्षांना सोबत घेण्याची गरज नाही. तशी कुठलीही चर्चा झालेली नाही. तसा काही प्रस्ताव आलेला नाही. नाशिकमध्ये भाजपाला कुबड्यांची गरज नाही. भाजपाचे ७२ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यांच्यात महत्त्वाची पदे वाटली जातील", असे ते म्हणाले. गिरीश महाजन यांनी जळगाव महापालिकेचा संदर्भ देत पुढे असेही म्हणाले की, "आम्ही एकत्र लढलो असतो, तर तसा विचार झाला असता. जळगावमध्ये भाजपाला १०० टक्के यश मिळाले. शिवसेनेचे २० नगरसेवक निवडून आले आहेत. तिथे एकत्रितपणे सत्ता स्थापन केली जाईल. मात्र, जिथे विरोधात लढलो आणि आमच्याकडे पूर्ण बहुमत आहे, तिथे मित्रपक्षांना सोबत घेणे शक्य नाही", असे महाजन यांनी स्पष्ट केले. शिंदेसेनेचे उपनेते अजय बोरस्ते यांनी गिरीश महाजनांच्या विधानावर बोलताना सांगितले की, "भाजपाचे वागणे अनाकलनीय आहे. भाजपाचे शहराध्यक्ष सुनील केदार स्वतः आमच्या पक्ष कार्यालयात आले होते. त्यांनीच सत्तेत सहभागी होण्याचा प्रस्ताव दिला होता. आता त्यांचे सर्वेसर्वा गिरीश महाजन कुबड्या नको असे म्हणत आहेत. हा शब्दप्रयोग अत्यंत चुकीचा आहे", असा संताप बोरस्ते यांनी व्यक्त केला. "आम्ही या संपूर्ण प्रकरणाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करणार आहोत. एकनाथ शिंदे जो आदेश देतील, तो आम्ही पाळू. त्यांनी विरोधी बाकावर बसण्यास सांगितले, तर आम्ही सक्षम विरोधी पक्षाची भूमिका बजावू", असेही बोरस्ते यांनी म्हटले आहे.

### महसूल प्रशासनाच्या भूखंडावर कोणाच्या आशीर्वादाने बांधकाम ?

तुमसर (दैनिक संध्या) : महसूल प्रशासनाच्या भूखंडावर कोणाच्या आशीर्वादाने भवनाचे बांधकाम करण्यात आले, असा संतप्त सवाल उपस्थित होत असून चिखला खाण परिसरात सुमारे ५० ते ५५ मौल्यवान सागवान वृक्षांची कत्तल करून इमारत उभारण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला? विशेष म्हणजे लाखो रुपये किमतीचे सागवान वृक्षांच्या कत्तलीनंतरही कारवाई शून्य आहे. याला वरदहस्त कुणाचा, असा सवाल आपसूकच निर्माण होत आहे. या संपूर्ण प्रकारास वन विभाग व महसूल विभागाची कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याची बाब समोर येत आहे. हा संपूर्ण परिसर झुडपी जंगल क्षेत्रात येतो, अशा भागात वनविभागाच्या परवानगीशिवाय एकही झाड तोडणे कायद्याने गुन्हा असताना येथे थेट सागवान वृक्षांची कत्तल करून भवन उभारले जाणे, हे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरत आहे. चिखला खाण प्रशासनाने आठ ते दहा वर्षांपूर्वी वृक्षांची नर्सरी उभारली होती. खाण प्रशासनाच्या माध्यमातूनच ही लागवड करण्यात आली होती. मात्र, आज त्याच झाडांची निर्दयीपणे कत्तल करून बांधकाम करण्यात आले. शासनाच्या वृक्षसंपत्तीवर खुलेआम कुऱ्हाड चालविण्यात आली आहे. कत्तल करण्यात आलेल्या ५० ते ५५ सागवान झाडांची आजच्या बाजारभावानुसार किंमत सुमारे १० ते १२ लाख रुपये असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# यामाहाचा भारतीय ईव्ही बाजारात प्रवेश

**EC-06 इलेक्ट्रिक स्कूटर १.६७ लाखांत लाँच**




या लाँचबाबत मत व्यक्त करताना यामाहा मोटर इंडिया ग्रुपचे अध्यक्ष Hajime Ohta म्हणाले, "EC-06 हे शाश्वत शहरी गतीशीलतेकडे यामाहाचे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कार्यक्षमता, कामगिरी आणि आधुनिक वैशिष्ट्यांचा उत्तम समतोल साधणारी ही स्कूटर भारतीय तरुण व तंत्रज्ञानप्रेमी राइडर्ससाठी आदर्श ठरेल. शाश्वतता आणि राइडिंगचा उत्साह एकत्र नांदू शकतो, हे या मॉडेलमधून स्पष्ट होते." एकूणच, नाविन्य, स्टाइल आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा संगम असलेली यामाहा EC-06 भारतीय ईव्ही बाजारात यामाहाची मजबूत सुरुवात दर्शवते.

मुंबई (दै. संध्या)

India Yamaha Motor यांनी भारतीय इलेक्ट्रिक वाहन (EV) बाजारपेठेत अधिकृत प्रवेश करत आपली पहिली इलेक्ट्रिक स्कूटर EC-06 सादर केली आहे. या स्कूटरची किंमत 1,67,600 रुपये (एक्स-शोरूम, दिल्ली) इतकी जाहीर करण्यात आली आहे. ब्ल्यूईश व्हाइट रंगात उपलब्ध असलेली ही प्रीमियम स्कूटर यामाहाच्या ब्ल्यू स्क्वेअर शोरूम्समार्फत निवडक शहरांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे.

EC-06 च्या लाँचसह यामाहाने इलेक्ट्रिक गतीशीलता क्षेत्रात धोरणात्मक पाऊल टाकले असून, पर्यावरणीय स्थिरतेप्रती असलेली आपली कटिबद्धता अधिक ठाम केली आहे. हे लाँच भारत सरकारच्या नॅशनल मिशन ऑन ट्रान्सफॉर्मेटिव मोबिलिटी तसेच 2070 पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन या राष्ट्रीय उद्दिष्टांशी सुसंगत आहे. भारतीय उत्सर्जन मानके आणि 'हरित व आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेशी सुसंगत राहून यामाहाने आपल्या कार्बन-न्यूट्रॅलिटी ध्येयांना बळ दिले आहे.

शहरी प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेली EC-06 169 किमी प्रमाणित रेंज देते. यामाहाच्या पारंपरिक डीएनएला आधुनिक डिझाइनचा स्पर्श देण्यात आला असून, स्थिर पवित्रा, आकर्षक बॉडी लाईन्स आणि 'होरिझॉन्टल कोअर डिझाइन'मुळे संतुलन व अचूकतेचा अनुभव मिळतो. ही स्कूटर दैनंदिन वापरासाठी तसेच तरुण राइडर्ससाठी उपयुक्त ठरते.

भारतामध्येच डिझाइन करण्यात आलेल्या EC-06 मध्ये IPMSM मोटर आणि 4 kWh फिक्स्ड बॅटरी देण्यात आली आहे. ही स्कूटर 79 किमी/तास कमाल वेग, 26 Nm टॉर्क आणि 6.7 kW कमाल शक्ती प्रदान करते. बॅटरीला 3 वर्षे किंवा 30,000 किमी वॉरंटी असून, साध्या होम प्लगद्वारे सुमारे 8 तासांत पूर्ण चार्जिंग शक्य आहे. मोटर व बॅटरीसाठी IP67, तर इतर इलेक्ट्रॉनिक्ससाठी IP65 प्रमाणन देण्यात आले आहे.

EC-06 मध्ये इको, स्टँडर्ड आणि पॉवर असे तीन राइडिंग मोड्स देण्यात आले आहेत. अरुंद जागेत सोयीस्कर हालचालीसाठी रिव्हर्स मोड, टेलिस्कोपिक फ्रंट सस्पेन्शन, रिअर कॉईल स्प्रिंग आणि हायड्रॉलिक डॅम्पर्स यांचा समावेश आहे. 200 मिमी फ्रंट व रिअर डिस्क ब्रेक्स, कॉम्बी ब्रेक सिस्टीम (CBS) मुळे सुरक्षित ब्रेकिंग सुनिश्चित होते.

आकर्षक कलर LCD डिस्प्लेवर वेग, बॅटरी स्थिती, राइडिंग मोड्स आणि कनेक्टिव्हिटी माहिती रिअल-टाइममध्ये उपलब्ध होते. एलईडी हेडलाइट्स व टेललाइट्समुळे रात्रीच्या राइडमध्ये अधिक दृश्यमानता मिळते.

नवीन EC-06 मध्ये 'यामाहा मोटर कनेक्ट आर' ॲपद्वारे कनेक्टेड राइडिंग अनुभव मिळतो. तसेच 24.5 लिटर अंडर-सीट स्टोरेजमुळे हेल्मेट, बॅग्स व दैनंदिन वस्तू सहज ठेवता येतात.

## होरिबा इंडियाने स्वच्छ आणि स्मार्ट ऑटोमोटिव्ह सोल्यूशन्स केले सादर

एच२-आयसीई इंजिन विकासासाठी डुमारे सोबतच्या आमच्या भागीदारीने आमच्या पुणे तांत्रिक केंद्रातील पोर्टफोलिओमध्ये समाविष्ट केलेल्या आमच्या हायड्रोजन चाचणी बेडवर हायड्रोजन अंतर्गत ज्वलन इंजिनच्या चाचणीमधील आमच्या क्षमता वाढवल्या आहेत."

पुणे (दै. संध्या)

प्रगत चाचणी आणि मापन तंत्रज्ञानातील जागतिक अग्रणी असलेल्या जपान-आधारित होरिबा ग्रुपची उपकंपनी असलेल्या होरिबा इंडिया ने, ऑटोमोटिव्ह उद्योगातील सर्वात प्रभावशाली जागतिक मंचांपैकी एक असलेल्या सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी (SIAT) २०२६ मध्ये सहभाग घेऊन, स्वच्छ गतिशीलतेसाठी आपले भविष्य-सज्ज उपाययोजना सादर केल्या. होरिबा इंडियाने या कार्यक्रमात जागतिक कौशल्य आणि स्थानिक नाविन्यपूर्णतेचे प्रभावीपणे एकत्रीकरण करून, स्मार्ट आणि स्वच्छ गतिशीलतेला चालना देण्यासाठी आपले स्थान अधिक मजबूत केले. यावेळी त्यांनी आपले पहिले स्थानिक पातळीवर विकसित केलेले इलेक्ट्रोलायझर टेस्ट स्टेशन (एक स्वदेशी इलेक्ट्रोलायझर चाचणी प्लॅटफॉर्म जे कार्यक्षमता, कामगिरी, टिकाऊपणा वाढवते आणि हरित हायड्रोजन उत्पादनाचा खर्च कमी करते) सादर केले.

आपल्या धोरणात्मक उद्दिष्टाचा पुनरुच्चार करत, होरिबा इंडिया ऑटोमोटिव्ह परिसंस्थेला प्रगत चाचणी आणि मापन तंत्रज्ञानाद्वारे सक्षम करत आहे, जे स्वच्छ उत्सर्जन, सुधारित ऊर्जा कार्यक्षमता आणि भविष्यातील नियामक चौकटींचे पालन करण्यास मदत करते. अंतर्गत ज्वलन इंजिन, हायब्रीड, इलेक्ट्रिक वाहने आणि हायड्रोजन तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांतील क्षमतांसह, कंपनीचा उद्देश एक विश्वासार्ह तंत्रज्ञान भागीदार बनण्याचा आहे, जो जपानी अचूकता आणि कौशल्य तसेच 'मेक इन इंडिया'च्या मजबूत क्षमतांना एकत्र आणून, ओईएम कंपन्यांना आगामी युरो ७ / बीएस७ मानके आणि वास्तविक-जगातील उत्सर्जनाच्या आवश्यकता पूर्ण करण्यास मदत करेल. २८ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि अधिवेशन केंद्रात आयोजित या तीन दिवसीय कार्यक्रमाला रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे माननीय मंत्री श्री नितीन गडकरी आणि अवजड उद्योग मंत्रालयाचे माननीय मंत्री श्री एच. डी. कुमारस्वामी यांच्यासह उद्योगातील मान्यवर उपस्थित होते. SIAT मध्ये, 'सुरक्षित आणि शाश्वत गतिशीलतेसाठी नाविन्यपूर्ण मार्ग' या परिषदेच्या संकल्पनेनुसार, होरिबा इंडियाने पुढील पिढीच्या गतिशीलतेला समर्थन देण्यासाठी डिझाइन केलेल्या प्रगत चाचणी आणि मापन उपायांचा एक व्यापक पोर्टफोलिओ देखील सादर केला.

कंपनीच्या सहभागावर भाष्य करताना, होरिबा इंडियाचे अध्यक्ष डॉ. राजीव गौतम म्हणाले, "भारत बीएस6 कडून बीएस7 आणि युरो 7-अनुरूप मानकांकडे वाटचाल करत असताना, अचूक, भविष्यासाठी सज्ज चाचणीची गरज कधीही इतकी महत्त्वाची नव्हती. होरिबामध्ये, 'मेक इन इंडिया' प्रति आमची वचनबद्धता केवळ उत्पादनापुरती मर्यादित नाही, तर ती स्थानिक चाचणी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि भारतीय ओईएमना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम करणाऱ्या कुशल क्षमता विकसित करण्याबद्दल आहे. रिअल ड्रायव्हिंग एमिशन मापनापासून ते मल्टी-फ्यूल पॉवरट्रेन प्रमाणीकरणापर्यंतचे आमचे प्रगत उपाय, या नियामक बदलाला समर्थन देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

## मतदारसंघाच्या विकासासाठी सुशील भायजे सज्ज

■ जनसेवेच्या जोरावर निवडणुकीच्या रिंगणात

संगमेश्वर (दै. संध्या)

धामापूरतर्फे संगमेश्वर जिल्हा परिषद मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीत विकासाचा नवा चेहरा म्हणून सुशील भायजे यांचे नाव अग्रक्रमाने चर्चिले जात आहे. "सत्ता नव्हे, जनसेवा" हा ध्यास घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या सुशील यांनी आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या माध्यमातून मतदारसंघाचा कायापालट करण्याचा संकल्प केला आहे. कोणतेही राजकीय पद पदरात नसतानाही सुशील भायजे यांनी आरोग्य शिबिरे, शेतकऱ्यांचे जिव्हाळ्याचे प्रश्न आणि युवकांसाठी रोजगाराचे उपक्रम राबवून आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामावर विश्वास ठेवणारा हा लोकनेता म्हणून मतदारसंघातील जनतेमध्ये त्यांच्याबद्दल मोठी ओढ निर्माण झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुशील भायजे यांनी आपला विकासाचा अजेंडा स्पष्ट केला आहे. यामध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण करणे, जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल क्रांती घडवून शैक्षणिक दर्जा सुधारणे, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न, गावोगावी रस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत गरजांची पूर्तता करणे इ. गोष्टींवर विशेष करून भर दिला जाणार आहे. मतदारसंघातील जनसंपर्क दौऱ्यादरम्यान सुशील भायजे यांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. "अडचणीच्या काळात धावून येणारा हक्काचा माणूस" अशी त्यांची प्रतिमा असल्याने, नागरिक त्यांच्याकडे केवळ उमेदवार म्हणून नाही तर कुटुंबातील सदस्य म्हणून पाहत आहेत.

## बायो-मायनिंगचा १३ कोटींचा कंत्राट वादग्रस्त कंपनीला ?

अमरावती (दै. संध्या)

महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनासाठी गत २१ दिवसांपूर्वी राबविलेल्या बायो-मायनिंग कंत्राट प्रक्रियेत एका वादग्रस्त कंपनीची निवड केली आहे. या कंपनीने बिहारच्या गया, पाटणा येथे एसएफएलएसची कामे केली असून बायो-मायनिंग कामाचे अनुभव नाही. तसेच बिहारच्या 'कॅग' ऑडिट अहवालात या कंपनीवर ताशेरे ओढण्यात आले आहे. असे असताना महापालिका प्रशासनाने कशाच्या आधारे नॅकॉफ इंडिया प्रा. लि. ची निवड करून १३ कोटींचा कंत्राट सोपविण्याचा निर्णय घेतला, हा संशोधनाचा विषय ठरत आहे. मनपाने बायो-मायनिंग कंत्राटाची निविदा प्रक्रिया १० जानेवारी २०२६ रोजी जारी केली होती. यात भोपाळ येथील नॅकॉफ इंडिया प्रा. लि., शिवप्रसाद बांदल एलएलपी पुणे, आरकेएफ पुणे आणि आरएनपी इन्फ्रा मुंबई अशा चार कंपनीनी सहभाग घेतला होता. मात्र, निविदा उघडल्यानंतर तांत्रिक कारणे पुढे करून दोन कंपन्यांना यातून प्रशासनाने अपात्र ठरविले. केवळ नॅकॉफ इंडिया प्रा. लि. आणि आरकेएफ पुणे या दोन कंपन्यामध्ये स्पर्धा झाली. अखेर पुणे येथील पीएमसीच्या अहवालानुसार नॅकॉफ इंडिया प्रा. लि. या कंपनीला बायो-मायनिंगची कामे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेचा दमदार तिसरा तिमाही निकाल

**निव्वळ नफा ५०३ कोटींवर, वार्षिक ४८% वाढ**

IDFC FIRST Bank

पुणे (दै. संध्या)

IDFC First Bank ने आर्थिक वर्ष 2026 च्या तिसऱ्या तिमाहीत (31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या) उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने या कालावधीसाठीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांना मंजुरी दिली असून, तिमाहीत बँकेचा निव्वळ नफा 503 कोटी रुपये झाला आहे. हा नफा मागील वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत 48 टक्क्यांनी वाढलेला आहे.

बँकेच्या कर्ज व अग्रिम रकमेतील वार्षिक वृद्धीमध्ये 89 टक्के हिस्सा हा मॉर्टगेज कर्ज, वाहन कर्ज, ग्राहक कर्ज, बिझनेस बँकिंग आणि घाऊक कर्जांचा आहे. यामुळे बँकेच्या मुख्य कर्ज व्यवसायाला बळकटी मिळाल्याचे चित्र आहे.

तिसऱ्या तिमाहीअखेर बँकेच्या वापरात असलेल्या क्रेडिट कार्डांची संख्या 4.3 दशलक्षांवर पोहोचली आहे. तसेच, बँकेच्या वेल्थ मॅनेजमेंट व्यवसायात 31 टक्क्यांची वार्षिक वाढ झाली असून, या व्यवसायाचे एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्ता (AUM) 58,957 कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

तिमाहीतील तरतुदी तिमाही दर तिमाही 3.7 टक्क्यांनी घटून 1,452 कोटींवरून 1,398 कोटी रुपये इतक्या झाल्या आहेत. यामुळे खर्च नियंत्रणात सुधारणा झाल्याचे दिसून येते.

निकालांवर प्रतिक्रिया देताना बँकेचे एमडी आणि सीईओ V. Vaidyanathan म्हणाले, "कर्ज वितरण, ठेवी, वेल्थ मॅनेजमेंट आणि ट्रान्झॅक्शन बँकिंग या सर्व प्रमुख व्यवसायांमध्ये मजबूत गती कायम आहे. 31 डिसेंबर 2025 अखेर एकूण अनुत्पादित कर्ज (GNPA) 1.69% आणि निव्वळ अनुत्पादित कर्ज (NNPA) 0.53% वर आल्याने मालमत्तेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. अलीकडे सेव्हिंग रेट्समध्ये केलेल्या बदलांमुळे फंड्सच्या खर्चात आणखी घट होण्याची अपेक्षा असून, त्यामुळे कर्ज व्यवसायाचा विस्तार अधिक वेगाने करता येईल."

एकूणच, मजबूत नफा, सुधारलेली मालमत्ता गुणवत्ता आणि विविध व्यवसाय विभागांतील वाढ यामुळे आयडीएफसी फर्स्ट बँकेने आर्थिक वर्ष 2026 च्या तिसऱ्या तिमाहीत विश्वासार्ह कामगिरी सादर केली आहे.

# सुनेत्रा अजित पवार : समाजकार्य, ग्रामविकास आणि संसदेतला ठाम आवाज

(दै. संध्या)

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**



महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि महिला सक्षमीकरणाच्या चळवळींमध्ये गेली चार दशके सातत्याने कार्यरत असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे खासदार श्रीमती सुनेत्रा अजित पवार. अत्यंत साधेपणातून, प्रत्यक्ष कामातून आणि लोकसहभागाच्या बळावर त्यांनी उभे केलेले विकासाचे मॉडेल आज काटेवाडीपासून संसदभवनापर्यंत प्रेरणादायी ठरले आहे.

- **माहेर, संस्कार आणि जडणघडण**

धाराशिव जिल्ह्यातील संत गोरोबाकाका यांच्या पावन भूमीवर वसलेल्या तेर गावात सुनेत्रावहिनींचा जन्म झाला. वडील कै. बाजीराव भगवंतराव पाटील हे मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक. तर मातृकुळात माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांचे राजकारण त्यांनी लहानपणापासून जवळून पाहिले. त्यामुळे समाजकारण व सार्वजनिक जीवनाची जाणीव त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नैसर्गिकपणे रुजली.

अर्थशास्त्राची पदवी (बी.कॉम.) घेत असतानाच चित्रकला, संगीत, निसर्ग फोटोग्राफी यांसारख्या कलांमध्ये त्यांनी प्रावीण्य मिळवले. मुंबईतील नेहरू सेंटरमध्ये त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन होणे, ही त्यांच्या सर्जनशीलतेची साक्ष आहे.

- **शेतीपासून समाजकार्यापर्यंतचा प्रवास**

लग्नानंतर काटेवाडी (बारामती) येथील शेतीत त्यांनी स्वतःला झोकून दिले. शेतात प्रत्यक्ष राबत, कष्टकरी वर्गाशी नाते जोडत त्यांनी शेती फुलवली. पोल्ट्री व्यवसाय दहा हजारांवरून एक लाखांपर्यंत नेला; शारदा दूध डेअरीत दूध संकलन वाढवले. हे सर्व करत असतानाच अजित पवार यांच्या वाढत्या राजकीय जबाबदाऱ्यांमुळे कुटुंबीय व सामाजिक पातळीवरील मोठी धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली.

- **विद्या प्रतिष्ठान आणि शैक्षणिक बांधिलकी**

विद्या प्रतिष्ठानच्या विद्यानगरी उभारणीदरम्यान त्या प्रत्यक्ष साक्षीदार होत्या. पुढे विश्वस्त म्हणून जबाबदारी स्वीकारण्याआधीच संस्थेच्या जडणघडणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन समिती व सिनेट सदस्य म्हणून त्यांनी शैक्षणिक धोरण, गुणवत्ता व प्रवेशवाढ यावर भर दिला.

- **काटेवाडी : एक आदर्श ग्रामविकास मॉडेल**

सन 2000 नंतर काटेवाडीतील विदारक परिस्थिती बदलण्याचा निर्धार त्यांनी केला. स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, गटार योजना, बँकिंग सुविधा, डिजिटल सेवा या सगळ्यांचा एकात्मिक आराखडा राबवून काटेवाडी निर्मलग्राम, यशवंतग्राम, तंटामुक्तग्राम, विमाग्राम, देशातील पहिले सायबरग्राम, कृषिग्राम आणि पर्यावरणग्राम ठरले.

महिलांच्या नावावर घरनोंदणी, 'गुड मॉर्निंग पथक', शाळा प्रवेश उत्सव, आयएसओ मानांकन या उपक्रमांनी गावाचा चेहरामोहरा बदलला. जागतिक बँक व सार्क देशांच्या प्रतिनिधींनी या मॉडेलची दखल घेतली.

- **महिला सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती**

काटेवाडीपासून बारामती तालुक्यापर्यंत महिलांना संघटित करून त्यांच्यातील स्वत्व जागृत करणे, आर्थिक स्वावलंबन देणे हे त्यांच्या कार्याचे केंद्रबिंदू. बारामती हायटेक टेक्सटाईल पार्कच्या माध्यमातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ६ हजारांहून अधिक महिलांना रोजगार मिळाला. पर्यावरण, जलसंधारण, आरोग्य, शिक्षण या सर्व क्षेत्रांत त्यांनी महिलांना पुढाकार दिला.

- **आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकी**

मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, कर्करोग व हृदयरोग तपासणी शिबिरे, मासिक पाळी जनजागृती लाखो रुग्णांना दिलासा देणारे उपक्रम त्यांनी राबवले. लाखो झाडांचे वृक्षारोपण, जलसंधारणातून लाखो लिटर पाणी अडवण्याचे काम, प्लास्टिकमुक्ती व पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जनजागृती या कामांतून बारामतीला पर्यावरणपूरक ओळख मिळाली.

- **उद्योजकता आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठ**

महाराष्ट्र स्टेट ॲग्री ॲंड रुरल टुरिझम फेडरेशन (मार्ट) स्थापन करून कृषी-ग्रामीण पर्यटनाला चालना दिली. आंतरराष्ट्रीय ग्रामीण उद्योजकता परिषदांचे आयोजन; सिंगापूर व फ्रान्स येथील वर्ल्ड आंत्रप्रिनरशिप फोरममध्ये सहभाग यातून जागतिक पातळीवर त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली.

- **संसदेतला ठाम, अभ्यासू आणि लोकाभिमुख आवाज**

२५ जून २०२४ पासून राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी व्यापक हिताचे प्रश्न आत्मविश्वासाने मांडले अंगणवाडी सेविका, शिक्षण-रोजगार, मुळा-मुठा नदी प्रदूषण, ग्रामविकास ते शहरी नियोजन. पहिल्याच टर्ममध्ये तालिका सभापतीपदी निवड होऊन सभागृहाचे शिस्तबद्ध संचालन केले.

शिक्षण, महिला सक्षमीकरण, कापड उद्योग, पर्यावरण व वने या समित्यांतील कामात त्यांनी प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे ठोस शिफारशी मांडल्या. मेक्सिकोतील आंतर-पार्लमेंटरी युनियन परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करताना महिलांवरील हिंसाचाराविरोधात भारताची ठाम भूमिका त्यांनी जागतिक व्यासपीठावर मांडली.

- **सन्मान आणि ओळख**

श्रीमद महासाधू श्री मोरया गोसावी जीवनगौरव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जीवनगौरव, ग्रीन वॉरियर, लोकमत आयकॉन, राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार असे अनेक राष्ट्रीय सन्मान त्यांच्या वाट्याला आले.

सुनेत्रा अजित पवार यांचा प्रवास हा 'एका रात्रीत बदल' झाल्याची कथा नाही; तो आहे अफाट मेहनत, जिद्द, लोकसहभाग आणि दीर्घकालीन दृष्टिकोन यांचा. काटेवाडीच्या मातीतून संसदभवनापर्यंत पोहोचलेला हा प्रवास आजही हजारो महिलांना, तरुणांना आणि ग्रामविकासाच्या चळवळींना प्रेरणा देत आहे आणि पुढेही देत राहील.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सुनेत्रा अजित पवार यांनी प्रितीसंगमावर केले स्व. यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज कराड येथील प्रितीसंगमावर महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर, खासदार सुनील तटकरे, खासदार नितीन पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, माजी आमदार बाळासाहेब पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर प्रथमच कराड येथे येऊन स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचे आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळाचे नातेही अत्यंत जिव्हाळ्याचे होते. ते वारंवार कराड येथे येऊन स्वर्गीय यशवंतराव चव्हाण त्यांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन करत होते. त्यांची आठवण यावेळी उपस्थितांना झाली.

### गहू उत्पादक शेतकरी संकटात! इंदापूर-बारामतीत 'तांबेरा'चा विळखा

इंदापूर (दैनिक संध्या) : इंदापूर आणि बारामती परिसरात वातावरणातील बदल आणि थंडीचा कडाका कमी झाल्यामुळे गहू उत्पादक शेतकरी चिंतेत सापडला आहे. काही भागांत गव्हाची वाढ खुंटली असून, काही ठिकाणी 'तांबेरा' रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.यावर्षी वातावरणात गारवा कमी राहिल्याने गहू पिकावर विपरीत परिणाम झाला आहे. उशिरा झालेल्या पेरण्यांमुळे गव्हाला आवश्यक असणारा थंडीचा कालावधी मिळाला नाही. परिणामी, गव्हाच्या लोंब्यांची लांबी कमी राहिली असून दाणेही पोसले गेलेले नाहीत. त्यातच अनेक ठिकाणी तांबेरा रोगाची लागण झाल्याने पीक धोक्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी ऊस तुटल्यानंतर उशिराने गव्हाची पेरणी केली, त्यांना या हवामान बदलाचा सर्वाधिक फटका बसत आहे. शेतकऱ्यांच्या मते, काही भागांमध्ये गव्हाचे पीक चांगल्या स्थितीत आले असून उतारा देखील समाधानकारक मिळणार आहे. मात्र, ज्या भागांमध्ये पेरणी उशिरा झाली किंवा थंडी कमी राहिली, तिथे गव्हाचे उत्पादन कमी राहणार आहे. तसेच तांबेरा रोगामुळे उत्पादनात घट होण्याची भीती आहे. पिकाची स्थिती चांगली असल्यास एकरी १५-१६ पोती उत्पन्न व्हायचे त्या तुलनेत यंदा पिकाची विरळ उगवण आणि रोगांचा प्रादुर्भाव यामुळे हे उत्पादन एकरी ८ ते ९ पोत्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. एका बाजूला काही भागात पीक समाधानकारक असले तरी, बहुतांश भागात उत्पादनात निम्म्याने घट होण्याची चिन्हे असल्याने शेतकऱ्यांच्या नफ्यात कपात होणार आहे. सततची निसर्गाची अवकृपा आणि पिकांवरील रोगांमुळे शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला असून, उत्पन्नाचे गणित जुळवताना त्याची दमछाक होत असल्याचे चित्र परिसरात दिसत आहे.

### अजितदादांच्या अंत्यस्थळी शरद पवार-प्रतिभा पवार झाले भावूक

इंदापूर (दैनिक संध्या) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतरचा पाचवा दिवस..! रविवारी सकाळीच बारामती सोडून मुंबईला जाण्यापूर्वी शरद पवार व प्रतिभा पवार बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या दिशेने म्हणजे जिथे अजित पवारांचे अंत्यसंस्कार केले, त्या ठिकाणी पोहोचले. तिथे पोहोचल्यावर त्यांनी अंत्यस्थळाकडे नजर टाकली आणि दोघेही स्तब्ध झाले. यावेळी आपला पुतण्या अजित पवार यांच्या आठवणींनी ते अत्यंत भावूक झाले. यावेळी त्यांनी विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त किरण गुजर यांच्याशी अजित पवारांच्या स्मृतीस्थळासंदर्भात चर्चा केली.रविवारी सकाळी मुंबईला निघण्यापूर्वी शरद पवारांनी अचानक अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार झालेल्या अंत्यस्थळाला भेट दिली. येथे पोहोचल्यानंतर त्यांनी अंत्यस्थळाकडे नजर टाकली आणि त्यावेळी दोघेही भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. याचवेळी त्यांनी विद्यापीठांचे विश्वस्त किरण गुजर यांच्याशी चर्चा केली. यानंतर काही वेळातच शरद पवार हे मार्गस्थ झाले. किरण गुजर यांनी बोलताना सांगितलं की, 'अजित दादांचे स्मारक भव्यदिव्य व्हावं, अशी शरद पवार साहेबांची इच्छा आहे. आज अंत्यस्थळी आल्यानंतर दोघेही भावूक झाल्याचे पाहायला मिळाले'. गुजर पुढे म्हणाले की, 'बारामतीत अनेक इमारती वेगवेगळ्या संकल्पनेतून झालेल्या आहेत. वेगवेगळ्या दृष्टिकोनातून झालेल्या आहेत. अजित पवारांची नियोजित स्मृतीस्थळ देखील अतिशय भव्यदिव्य व्हावे. अशा स्वरूपाने बारामतीसह राज्यभरातील विविध वास्तू विश्वस्तांकडे चर्चा करून व त्यांच्याकडून आलेख घेऊन अत्यंत चांगल्या प्रकारचे स्मृतिस्थळ करण्याची आमच्या सर्वांची इच्छा आहे आणि त्यानुसार हे काम होईल. त्याचीच चर्चा शरद पवार व प्रतिभा काकी यांनी केली' असं किरण गुजर यांनी सांगितले.

### मावळात प्रचाराला सुरूवात! निवडणुकींच्या रणधुमाळीत संयम आणि शिस्तीची संगत

इंदापूर (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील राजकीय वातावरणावर गेल्या काही दिवसांपासून शोकछाया पसरली आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर तालुक्यासह राज्यात तीन दिवसांचा शासकीय दुखवटा पाळण्यात आला. या काळात सर्व प्रकारच्या राजकीय हालचाली, सभा, प्रचार आणि कार्यक्रमांना स्थगिती देण्यात आली होती. मात्र दुःख बाजूला सारत मावळ तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचाराला पुन्हा सुरुवात झाली असून, संपूर्ण तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे.दुखवट्यामुळे सर्व पक्षांनी थांबवलेला निवडणूक प्रचार आता शांतपणे आणि संयम राखत नव्याने सुरू करण्यात आला आहे. तालुक्यातील प्रत्येक गाव, वाडी-वस्तीमध्ये प्रचाराचे चित्र दिसू लागले आहे. ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणार असल्याचे आयोगाने जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मतदानाच्या तारखेत बदल केल्याने राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.मतदानाच्या तारखेत झालेल्या या बदलामुळे उमेदवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना प्रचारासाठी दोन दिवसांची अतिरिक्त मुदत मिळाली आहे. या अतिरिक्त वेळेचा उपयोग करून मतदारांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचता येणार असल्याने सर्वच राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. प्रचाराची रणनीती नव्याने आखली जात असून, प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यावर भर दिला जात आहे.सध्या मावळ तालुक्यातील बहुतांश भागांमध्ये उमेदवार घरोघरी जाऊन मतदारांची भेट घेत आहेत. उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते प्रचारात व्यस्त असल्याचे चित्र आहे. कोणत्याही पक्षावर आरोप प्रत्यारोप न करता मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधत आपली भूमिका मांडणे, आतापर्यंत केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा देणे आणि भविष्यातील आराखडे सांगणे, हा प्रचाराचा मुख्य केंद्रबिंदू ठरत आहे.

# श्री म्हाळसाकांत खंडोबाची यात्रा उत्साहात सुरू

मंचर (दै. संध्या)



पुणे, नगर, नाशिक व मुंबई जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आणि कुलदैवत असलेल्या आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील श्रीक्षेत्र श्री म्हाळसाकांत खंडेरायाची वार्षिक यात्रा रविवार (१ फेब्रुवारी २०२६) रोजी मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात सुरू झाली. 'सदानंदाचा येळकोट'च्या गजरात, भंडारा व खोबऱ्याची उधळण करत हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

खेड, आंबेगाव, जुन्नर, पारनेर, सिन्नर, हवेली व शिरूर तालुक्यांसह पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई व नवी मुंबई येथून भाविक मोठ्या संख्येने यात्रेसाठी दाखल झाले होते. पहाटे मुख्य मंदिरातील स्वयंभू सप्तशिवलिंगाचा रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक देवस्थानचे मानकरी व सेवेकरी भगत तांबे व वाघे मंडळी यांच्या हस्ते पार पडला. त्यानंतर पंचधातूच्या सर्वांगसुंदर खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मुखवट्यांची प्रतिष्ठापना करून देवांना वस्त्रालंकार घालण्यात आले. तसेच खंडोबाची बहीण जोगेश्वरी देवीच्या मूर्तीलाही वस्त्रालंकार अर्पण करण्यात आले.

यानंतर देवस्थानचे सेवेकरी दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, प्रभाकर भगत, धोंडीबा भगत, ज्ञानेश्वर भगत, शांताराम भगत, नामदेव भगत, पांडुरंग भगत, माऊली वाघे, दिनेश जाधव, अनिरुद्ध वाळुंज व बाळकृष्ण साळगट आदींनी खंडोबाला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून पारंपरिक पूजा केली. हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाआरती पार पडली. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

पूजेनंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. भाविकांनी शिस्तबद्ध रांगेत उभे राहून दर्शन घेतले. आळे पाडळी (ता. पारनेर) येथील थोरात बंधू यांच्या सौजन्याने मंदिर व परिसरात करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. गाभाऱ्यात व मंदिराभोवती फुलांची सुरेख सजावट करण्यात आली होती.

यात्रेदरम्यान भाविकांकडून तळी-भंडाऱ्याची उधळण, नवसपूर्तीचे जागरण-गोंधळ सुरू होते. यात्रेच्या घाटातून नवसाचे बैलगाडे धावले, ज्याचा आनंद भाविकांनी मोठ्या उत्साहात घेतला. जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या धामणीच्या खंडोबाच्या बैलगाडा शर्यतीचा घाट पुन्हा एकदा भाविकांनी गजबजून गेला.

यात्रेत जिलेबी, भजी, शेव-चिवडा, रेवडी आदी खाद्यपदार्थांचा आस्वाद भाविकांनी घेतला. माही पुनवेच्या यात्रेतील या पदार्थांची चव वेगळीच असल्याचे भाविक सांगत होते. लहान मुलांनी पाळण्यात बसण्याचा आनंद लुटला, तर शेतकऱ्यांनी शेतीसाठी लागणारी अवजारे खरेदी केली.

धामणी, लोणी, शिरदाळे, पहाडदरा, खडकवाडी, महाळुंगे, गावडेवाडी, जारकरवाडी, पाबळ आदी गावांतील ग्रामस्थांनी पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढून देवास हारतुरे व नैवेद्य अर्पण केला. धामणीच्या पेठेतून नवसाच्या बगाडाचीही मिरवणूक काढण्यात आली.

भाविकांसाठी लोकवर्गणीतून उभारण्यात आलेल्या सुमारे ४० हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभामुळे पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय करण्यात आली होती. आरोग्य विभागाकडून वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

यात्रेच्या काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली व पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दोन दिवसांसाठी सुमारे ५० पोलीस कर्मचारी व दंगल नियंत्रण पथक तैनात करण्यात आले होते. देवस्थान, सेवेकरी मंडळी, यात्रा समिती, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ व तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी यात्रेची सर्व व्यवस्था यशस्वीपणे पार पाडली. धामणीच्या खंडोबाच्या यात्रेने जिल्ह्यातील गावोगावच्या ग्रामदैवतांच्या यात्रेला परंपरेनुसार सुरुवात झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## जुन्नर तालुक्यात कांदा उत्पादक हतबल; उत्पादन घटलं अन्...

पुणे (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील माळशेज परिसरातील मुख्य नगदी पीक असलेल्या कांद्याने यंदा शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले आहे. सलग दोन वर्षांपासून बदलणारे हवामान, उत्पादनातील मोठी घट आणि बाजारपेठेतील घसरलेले दर यामुळे कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक पेचात सापडला आहे. एकरी लागवडीसाठी लाखो रुपये खर्च करूनही बाजार समितीत मिळणारा भाव कवडीमोल असल्याने ग्रामीण भागातील अर्थकारण कोलमडले आहे. सध्या एकरी कांदा लागवडीसाठी बियाणे, मशागत, खते आणि मजुरी असा एकूण खर्च एक लाख रुपयांच्या पुढे जात आहे. मात्र, बाजार समितीत कांद्याला प्रतिकिलो केवळ १२ ते १६ रुपये दर मिळत आहे. पूर्वी ज्या जमिनीत १८ ते २० टन उत्पादन मिळत होते, तिथे आता अवकाळी पाऊस आणि रोगांच्या प्रादुर्भावामुळे केवळ १० ते १२ टनांवर उत्पादन मर्यादित झाले आहे. खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नसल्याने शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकत चालले आहेत. कांद्याला हमीभाव आणि स्थिर निर्यात धोरण मिळावे, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे. आळेफाटा यार्डमध्ये मंगळवार, शुक्रवार आणि रविवार या दिवशी लिलावात हजारो गोणी कांदा येतो. मात्र मिळणारा दर इतका कमी आहे की, हमाली, कडता, आणि भाडेही सुटत नाही. मेहनत, कर्ज आणि जोखीम शेतकऱ्यांचीच राहते. व्यापारी याचा फायदा घेतात, पण शेतकरी रोज तोट्यात जात आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून हमीभाव आणि पारदर्शक लिलाव व्यवस्था लागू करावी.

## अजित पवारांच्या अंत्यसंस्कारावेळी गर्दीत चोरांनी साधला डाव

पुणे (दै. संध्या)

■ २० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीस



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दि.२८ रोजी विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामती येथे महाराष्ट्रातुन मोठ्या प्रमाणात नेते, नागरिक, कार्यकर्ते व महिला भगिनींची तुफान गर्दी झाली होती.

या गर्दीचा गैरफायदा घेत काही अज्ञात चोरट्यांनी उपस्थित नागरिकांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या व रोख रक्कम चोरी केल्याची घटना घडली.

या घटनेत वेगवेगळ्या नागरिक व साक्षीदार यांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या तसेच रोख रक्कम असा अंदाजे २० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे तपासात निष्पन्न होत आहे.

या प्रकरणी बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा तक्रारदारांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार फिर्यादी रणजीत बाळासाहेब जाधव तसेच साक्षीदार विश्वजीत अनिल तुपे, अंकुश शांताराम दिघे, प्रशांत लक्ष्मण सपकाळ, विकास कैलास भागवत, रणजीत मधुकर भोंगळे व इतर यांचा सोन्याच्या चैन रोख रक्कम असा अंदाजे २० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

गुन्हा दाखल होताच बारामती पोलिसांनी तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान राजकुमार बाबुराव आठवले (रा.तलवाडा ता.गेवराई, जि. बीड), मोहम्मद अनीस मोहम्मद युनूस (रा. गवळीपुरा, डिग्रज, यवतमाळ), एजाज भगु मीरावले (रा.गवळीपुरा, डिग्रज, यवतमाळ), मोहम्मद सादिक मोहम्मद गफार (रा. मोतीनगर, डिग्रज, यवतमाळ),

बाळू उर्फ दत्तात्रय बबन धोत्रे (रा. इंदिरानगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर सध्या रा. पळसदेव, ता. इंदापूर, जि. पुणे), तुषार कैलास मासाळ (रा.कोरडगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर), नितीन अंकुश गायकवाड (रा. शिक्षक कॉलनी, ता. बीड,जि.बीड) आदी आरोपींना अटक आली आहे.

आरोपींकडून चोरीस गेलेला सोन्याचा मुद्देमाल व रोख रक्कम हस्तगत करण्यासाठी पोलीस तपास सुरू असून, आरोपींची कसून चौकशी करण्यात येत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपासात पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील, सहा. पोलीस उपनिरीक्षक सुरेंद्र वाघ, पोलीस हवालदार किशोर वीर, तसेच पोलीस अंमलदार राजू बन्ने, मनोज पवार, जितू शिंदे, हनुमंत खटके यांनी सहभाग घेतला आहे. गुन्ह्याचा पुढील अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील हे करत आहेत.


## केंद्रीय अर्थसंकल्पावर खासदार धैर्यशील मोहिते पाटील काय म्हणाले?

पुणे (दै. संध्या)

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये शेतकरी, युवक आणि ग्रामीण भारताच्या अपेक्षांना न्याय मिळालेला नाही. महागाई, बेरोजगारी आणि शेतीतील वाढता खर्च या ज्वलंत प्रश्नांवर कोणतीही ठोस उपाययोजना या अर्थसंकल्पात दिसून येत नाही, अशी तीव्र टीका माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केली आहे.केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मोहिते पाटील म्हणाले की,

शेतकऱ्यांसाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) ला कायदेशीर हमी देण्याचा महत्त्वाचा मुद्दा यंदाही सरकारने डावलला आहे. तसेच सिंचनासाठी राज्यनिहाय, विशेषतः महाराष्ट्रासाठी स्वतंत्र व ठोस निधीची घोषणा न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. खत, बियाणे, वीज आणि इंधनाच्या वाढत्या खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना दिली जाणारी थेट आर्थिक मदत अपुरी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

युवकांच्या प्रश्नांवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणाऱ्या ठोस योजना या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत. कौशल्य विकासाच्या नावाखाली प्रशिक्षण दिले जात असले तरी त्या प्रशिक्षणानंतर रोजगाराची कोणतीही हमी दिली जात नाही. शिक्षण पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या तरुणांच्या हाताला काम देण्याचे ठोस धोरण सरकारकडे नसल्याचे या अर्थसंकल्पातून पुन्हा स्पष्ट झाले आहे, असे त्यांनी सांगितले.



> "हा अर्थसंकल्प मोठ्या उद्योगपतींसाठी तयार करण्यात आला आहे. शेतकरी, कष्टकरी आणि युवकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात आले असून हा अर्थसंकल्प सर्वसामान्यांसाठी पूर्णपणे अपुरा ठरलेला आहे."
> **- धैर्यशील मोहिते पाटील, खासदार, माढा लोकसभा**

## केंद्र आणि राज्य सरकारचा निधी खेचून आणू : दीपाली गव्हाणे

पुणे (दै. संध्या)

सामान्य, कष्टकरी आणि तळागाळातील घटकांच्या प्रश्नांना न्याय देत विकासाची नवी दिशा देणार असून तळेगाव ढमढेरे – रांजणगाव सांडस जिल्हा परिषद गट सुजलाम-सुफलाम करून दाखवू, असा निर्धार भाजपच्या उमेदवार दिपाली गव्हाणे यांनी व्यक्त केला आहे. रांजणगाव सांडस गावात आयोजित प्रचार दौऱ्यादरम्यान त्या मतदारांशी संवाद साधताना बोलत होत्या. या प्रचार दौऱ्यात दिपाली गव्हाणे यांनी मतदारांशी थेट संवाद साधून शेती, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि महिला व युवकांच्या रोजगाराच्या संधींबाबत सखोल चर्चा केली. यावेळी त्यांनी सांगितले की, राज्य आणि केंद्रात भाजपचे सरकार असल्याने विकासासाठी आवश्यक असणारा निधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होईल आणि निधीअभावी कोणतीही कामे रखडणार नाहीत. सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ थेट गावागावांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी पाठपुरावा करण्यावर आपला भर असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.दिपाली गव्हाणे यांना वडगाव शेरीचे माजी आमदार बापूसाहेब पठारे यांच्या कार्याचा वारसा आणि संस्कार लाभले आहेत. बापूसाहेब पठारे यांची सर्वसामान्यांशी असलेली नाळ आणि विकासाची कार्यपद्धती गव्हाणे यांच्या कार्यशैलीतही दिसून येत आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्पात पुणेकर व्यापाऱ्यांची निराशा

पुणे (दै. संध्या)

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६–२०२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला आहे. पुणे हे व्यापाराचे आणि मध्यमवर्गीयांचे मोठे केंद्र असून, या अर्थसंकल्पात सर्वसाधारण करदात्यांना थेट मोठी सूट नाही यावरून येथील व्यापारी वर्गाकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात वैयक्तिक आयकरात सर्वसाधारण करदात्यांना मोठी सवलत मिळेल, अशी अपेक्षा पुणेकर व्यापाऱ्यांना होती. मात्र, प्रत्यक्ष कररचनेत कोणताही क्रांतिकारी बदल न केल्याने व्यापारी वर्गातून संमिश्र तर काही प्रमाणात नाराजीची प्रतिक्रिया उमटली आहे.

सर्वसाधारण करदात्यांना कुठलाही दिलासा नसलेला अर्थसंकल्प आहे. परंतु, छोट्या करदात्यांसाठी नवीन स्कीम आणणार हे स्वागतार्ह आहे. आत्मनिर्भर भारत योजनेला गती व महिला वर्ग केंद्रस्थानी ठेवून अर्थसंकल्प मांडला आहे. मात्र, व्यापाराकरिता कोणतीही विशेष सवलत नाही. वास्तविक पाहता जीवनावश्यक वस्तू सीएसटीमुक्त होणे आवश्यक आहे. ही व्यापाऱ्यांची अनेक वर्षांची मागणी आहे. त्यामुळे व्यापार विभागाची नाराजी आहे.

प्रवास व दळणवळण जलद होण्यासाठी मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरने जोडणार असल्याने पुणे टेक्नॉलॉजी व विकासाच्या केंद्रस्थानी राहील ज्याचा मोठा फायदा पुण्याला होईल आणि आत्मनिर्भर भारत योजनेला गती मिळेल.

अर्थसंकल्पात 'युवाशक्ती' आणि 'विकसित भारत' यावर विशेष भर देण्यात आला आहे. मात्र, व्यापारी व शेतकरी हा देशाचा मुख्य अविभाज्य घटक आहे. देशाच्या प्रगतीमध्ये सर्वांत मोठी वाटचाल शेतकरी व व्यापाऱ्यांमुळे होते. शेतकरी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये शेती करतो. मात्र, नैसर्गिक आपत्तीनंतर त्याच्या जीवनाची वाटचाल अवघड होते. शेतमालाला न मिळणारा हमीभाव, होणारा खर्च आणि झालेले नुकसान यासंदर्भात सरकारने विचार करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यापाऱ्यांना कर सवलत देणे गरजेचे आहे.

भारताला आत्मनिर्भर व उज्ज्वल भविष्यासाठी चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात छोट्या-छोट्या उद्योगांसाठी भरपूर तरतूद केली आहे. या छोट्या उद्योगधंद्यांमुळे सर्वांना फायदा होणार आहे. त्याचप्रमाणे ग्लोबल डेटा सेंटर उभे करण्यात येणार आहे व सात हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर बनविण्यात येणार आहेत. त्यामुळे हे बजेट 'सबका साथ - सबका विकास' डोळ्यांसमोर ठेवून केलेले सर्वसामान्यांच्या हिताचे बजेट आहे.

नोकरदार वर्गाला आयकरात अपेक्षित असलेली सूट जरी मिळाली नसली, तरी कर्करोग व मधुमेहावर औषधांच्या किमतीवर दिलेली सवलत त्याचप्रमाणे अपघात विम्याच्या रकमेवरही कोणत्याही प्रकारे कर असणार नाही हे निश्चितपणे दिलासादायक आहे. अनेक क्षेत्रातील मूलभूत सुधारणांवर भर दिल्यामुळे मेक इन इंडिया व स्वदेशी विचाराला चालना देणारे बजेट आहे. सहकार क्षेत्रामध्ये विशेषता सहकारी उद्योग यांना काही सवलती अपेक्षित होत्या.



### दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने सकारात्मक अर्थसंकल्प

केंद्र सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प हा पायाभूत सुविधा, उद्योग आणि उत्पादन क्षेत्रासाठी दीर्घकालीन विकासाला चालना देणारा आहे. रस्ते, रेल्वे, मेट्रो आणि लॉजिस्टिक्ससाठी करण्यात आलेली मोठी तरतूद स्वागतार्ह आहे. अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंच्या पारंपरिक व्यापारासाठी थेट आणि ठोस स्वरूपाच्या विशेष सवलती किंवा योजना या अर्थसंकल्पात दिसून आलेल्या नाहीत. ही बाब व्यापारी वर्गाच्या दृष्टीने चिंतेची आहे.

**- राजेंद्र बाठिया अध्यक्ष, दी पूना मर्चंड चेंबर**